# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४४**

MAHMARI 19358/13/1/2000 -TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दहावे / अंक ९ / ऑगस्ट २००९

## संपादकीय

## स्वाइन फ्लू आणि सामाजिकतेचे भान

साथीचे रोग व या रोगांचा प्रसार हा स्वाइन फ्लूच्या निमित्ताने चर्चेत असणारा गंभीर विषय आहे. या विषयाबद्दलचे अज्ञान आणि याही विषयात गुंतलेले अनेकांचे हितसंबंध यामुळे साथीच्या रोगापासून घ्यावयाचे धडे, आत्मपरीक्षण याकडे मात्र सार्वत्रिक दुर्लक्ष झालेले दिसते. मेक्सिकोत उगम पावलेला हा रोग अमेरिका खंड, युरोपभर व जगातील सर्वच देशांत प्रवाशांच्या मार्फत पसरला. या रोगाची लागण दुर्दैवाने तीव्रतेने होते. पुणे येथे प्रामुख्याने आणि मुंबई व त्यापाठोपाठ इतर शहरांतही हा रोग पसरत गेला आहे. साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यात स्वच्छतेचा अभाव हे प्रमुख कारण तर आहेच, पण सामाजिक दृष्टिकोनाचा अभाव, सत्तेची लालसा व इतर आनुषंगिक कारणेही बरीच आहेत. पुणे, मुंबई हे शहरी इलाखे आहेत. ही शहरे सुशिक्षित आहेत; तरी सुद्धा या इलाख्यांमध्ये या रोगाची झालेली हाताळणी भयावह आहे.

शिक्षण माणसाला सुसंस्कृत तर बनवतेच, पण निर्णय घेण्याची त्याची क्षमताही वाढवते. विशेषत: संघर्षाचे प्रसंग, आपत्तींचे प्रसंग अशावेळी निर्णयक्षमता महत्त्वाची ठरते. ही निर्णयक्षमता शिक्षणातून विकसित होण्याची अपेक्षा असते.

परंतु विषयाची माहिती म्हणजे शिक्षण हा चुकीचा समज आपल्याकडे आहे. त्यामुळे हे होताना दिसत नाही. वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक अशा सर्व पातळ्यांवर जेव्हा या स्वरूपाचे अडचणींचे, संकटांचा सामना करण्याचे प्रसंग येतात, तेव्हा कमीत कमी हानिकारक ठरतील असे उपचार करण्याची क्षमता हे सुशिक्षित समाजाचे लक्षण ठरते.

या पार्श्वभूमीवर पुण्या मुंबईत स्वाइन फ्लू ज्या पद्धतीने हाताळला गेला ती पद्धत म्हणजे दिवाळखोरीची प्रवृत्ती होय! गोंधळलेला, गांगरलेला समाज केवळ दोषारोप करण्यास प्रवृत्त होतो हे यांतून दिसून आले. अशा साथी विषाणूंच्या स्वत:तील जिवंत राहण्याच्या, टिकून राहण्याच्या सीमित क्षमतेमुळे काही काळापुरत्या नाहीशा होतात.

या सर्व गोंधळामध्ये सर्वांत जास्त दिवाळखोरी कोणी दाखवली असेल तर ती माध्यमे व राजकारणी लोकांनी. दडपशाही व गुंडगिरी करून ठाण्यामधील शाळा बंद पाडणारे, सार्वजनिक वाहतुकीचे रस्ते अडवून सण 'साजरे' करणारे हे धटिंगण ही आजच्या समाजाला लागलेली मोठी कीड आहे. वाढदिवसासारखा दिवस हा प्रेम, सद्भावनेने आपल्या कुटुंबात साजरा केला जावा अशी अपेक्षा असते. असा दिवस जबरदस्तीने कोणावर लादायचा नसतो; पण आजची तथाकथित नेते मंडळी आपल्या छब्या रस्तोरस्ती, गल्लोगल्ली लावतात. यातून ही धटिंगण मंडळी पूर्ण शहर विद्रूप करतात. त्यांच्या या बेकायदेशीर, बेलगाम

(पृष्ठ क्रमांक २१ वर)



## पसायदान

*(या महिन्यात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची जयंती आहे. त्यांचे पवित्र स्मरण करून हे पसायदान येथे देत आहोत.)*

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावे।
तोषोनि मज द्यावे। पसायदान हें ।।१।।

जे खळांची व्यकटी सांडो। तया सत्कर्मी रति वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचे ।।२।।

दूरिताचे तिमिर जावो।
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो। प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळी। भेटतु भूतां ।।४।।

चला कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणीचे गांव।
बोलते ते अर्णव। पीयूषाचे ।।५।।

चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वाही सदा सज्ञन। सोयरे होतु ।।६।।

किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिही लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित ।।७।।

आणि ग्रंथोपजीविंये। विशेषीं लोकीं इयें।
दृष्टादृष्ट विजयें। हो आवें जी ।।८।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो। हा होईल दानपसावो।
येणें वरें ज्ञानदेवो। सुखया जाला ।।९।।




**वर्ष दहावे / अंक ९ / ऑगस्ट २००९**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक २ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मन एक दैवी शक्ती | श्री. यशवंत माने | ३ |
| २) | माझी माय सरस्वती | श्रीमती आशा भिडे | ५ |
| ३) | मुक्ताई | श्री. शं. बा. मठ | ११ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १५ |
| ५) | वाढदिवसाचे वाढते प्रस्थ ! | सौ. अंजली पटवर्धन | २२ |
| ६) | श्रवणीय काही - १ | प्रा. डॉ. प्रदीप कर्णिक | २३ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# मन एक दैवी शक्ती

*वाईट विचारांपासून दूर राहण्याची सवय मनाला लागली तर मनातील शक्ती तत्त्वाचा अनुभव आल्याखेरीज राहात नाही. - संपादक*

माणसांच्या मनात अनेक प्रकारच्या इच्छा असतात परंतु त्या सर्व इच्छा पूर्ण होतातच असे नाही. शिवाय त्यांच्या मनातील इच्छांना अंतही नसतो. एक इच्छा पूर्ण झाली की दुसरी निर्माण होते आणि दुसरी पूर्ण झाली की तिसरी निर्माण होत असते. असे नित्य चक्र चालूच असते. पूर्वीचे लोक सांगत असे की, कल्पवृक्षाच्या झाडाखाली बसून आपण जे-जे काही मागतो त्या सर्व इच्छा पूर्ण होत असत. हे किती सत्य-असत्य आहे हे सांगता येत नाही; पण माणसाचे मन हेच कल्पवृक्ष असते असे मात्र ठामपणे सांगता येईल. आपल्याला जे काही हवे असते, ते आपल्या मनालाच मागा. आपल्या इच्छा किंवा अपेक्षा आपले मनच पूर्ण करीत असते. आपले मन आपल्या इच्छा पूर्ण करीत असते पण आपण मात्र इच्छापूर्तीसाठी दुसऱ्यांच्या मदतीची अपेक्षा करीत असतो. त्यांच्या पुढे हात जोडत असतो. याठिकाणी आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे आपल्या अपेक्षा आपल्यालाच पूर्ण करावयाच्या असतात. दुसरे कोणीही पूर्ण करीत नसते. त्यासाठी स्वत:लाच कष्ट घ्यावे लागतात, मेहनत करावी लागते.

मन हे दोन प्रकारचे असते. १) अंतर्मन, २) बहिर्मन. आपण दररोज वरवरचा जो विचार वारंवार करीत असतो तोच विचार बहिर्मनाद्वारे अंतर्मनावर बिंबवला जातो. आणि त्यातूनच मन घडत असते, ते तयार होत असते. समजा, आपण नेहमी भीतीचाच विचार करू लागलो तर आपल्याला प्रत्येक गोष्टीत भीतीच वाटू लागते. भित्र्या माणसाला सगळीकडे भयच दिसू लागते. आपला मुलगा म्हातारपणी आपल्याला सांभाळेल की नाही? चांगली नोकरी मिळेल की नाही? सहकाऱ्यांची साथ मिळेल का? माझ्या जवळील संपत्ती मला पुरेल का? अशा प्रकारची भीती अनेकांच्या मनात दिसून येते. ते नेहमी याचाच विचार करीत असतात. अशा प्रकारच्या वारंवार विचार करण्यातूनच त्यांचे मन घडत असते. अशी माणसे नेभळट आणि भित्री असतात, ती कोणापुढेही बोलण्यास घाबरतात. एवढेच काय अशा प्रकारचा विचार करणारी माणसे स्वत:च्या सावलीलाही घाबरतात. म्हणून आपण चिंतेपेक्षा चिंतन चांगले करावे. आपले चिंतन किंवा आपले विचार चांगले असतील तरच चांगले मन चांगले तयार होते. म्हणून मुलांना लहान वयात काय विचार करावा यापेक्षा विचार कसा करावा याची शिकवण द्यायला हवी. तरच ते योग्य विचार करतील.

आपल्या अनेकवेळा लक्षात येते की, ज्या गोष्टींना आपण भीत असतो नेमकी तीच गोष्ट आपल्यासमोर येत असते. कारण आपण विचारच त्या पद्धतीने केलेला असतो. आपल्या अंतर्मनावर त्या गोष्टी वारंवार रुजवलेल्या असतात. काही वेळेस तर अनेक व्यक्ती नेहमी आपणास म्हणत असतात की, मी तुला अगोदरच सांगितले होते हे असे घडणार आहे म्हणूनच तर ते घडले. तू योग्य ती काळजी घ्यायला हवी होतीस. कारण अशा व्यक्तींनी त्याच पद्धतीने विचार केलेला असतो. त्यांचा त्यांच्या विचारांवर पूर्ण विश्वास असतो. त्यांचे चिंतन योग्य पद्धतीने चालेले असते म्हणूनच ते खात्रीपूर्वक असे सांगू शकतात. म्हणून आपल्या चिंतनावर किंवा आपल्या विचारांवर आपला दृढ विश्वास हवा. विद्यार्थी वर्षभर प्रामाणिकपणे अभ्यास करतो, परीक्षेचा सराव करीत असतो. कोणते प्रश्न परीक्षेत येणार याचा एक आराखडा आपल्या मनात तयार करीत असतो. परीक्षेच्या पहिल्या दिवशी त्याला स्वप्नात एक प्रश्नपत्रिका

दिसते. आणि नेमके तेच प्रश्न प्रश्नपत्रिकेत दुसऱ्या दिवशी त्याला दिसून येतात. कारण अशा विद्यार्थांचा त्यांच्या अभ्यासावर किंवा त्यांनी केलेल्या विचारांवर ठाम विश्वास असतो; म्हणून त्यांचे स्वप्नही सत्यात उतरत असते.

मानवी मनामध्ये एक अद्‌भुत शक्ती असते. मन केव्हाही स्थिर नसते. अगदी आपण झोपलो तरीही मन भटकतच असते. झोपेत आपणास जी स्वप्ने पडतात त्यावरून हे आपल्या लक्षात येत असते. आपणास पंख नसतानाही आपण स्वप्नात आकाशात उंच भरारी घेत असतो, परदेश दौरे करीत असतो, प्राण्यांबरोबर खेळ खेळत असतो, अशा प्रकारची अनेक स्वप्ने नेहमी आपणास पडत असतात. म्हणजेच आपण ज्या गोष्टी पाहिलेल्या नसतात अशा गोष्टीही झोपेत आपण पहात असतो. आणि त्यांचा मनमुराद आनंदही घेत असतो. आपण झोपलो असलो तरीही अनेक घडामोडी घडत असतात. घडणाऱ्या घडामोडी केव्हा आणि कशा घडतात याचा आपणास पत्ताही नसतो पण घडतात मात्र नक्की. कॅमेरा लावून आपण झोपलो तर आपल्या सहज ते लक्षात येईल. एका रात्रीत अनेकवेळा या कुशीवरून त्या कुशीवर होत असतो, शरीराच्या अनेक प्रकारच्या हालचाली होत असतात हे आपणास माहीतही नसते. आपल्या शेजारी झोपलेली व्यक्ती दुसऱ्या दिवशी आपणास सर्व सांगत असते. झोपेत तुम्ही बडबड करीत होता, किंवा मोठ्याने ओरडत होता किंवा रडत होता वगैरे वगैरे. म्हणजेच झोपेत आपण पार्ट्यांना जातो, मित्र-मैत्रिणींसोबत गप्पा मारत असतो, किंवा इतर अनेक प्रकारच्या ज्या गोष्टी घडत असतात ही केवळ मानवी मनाची दैवी शक्तीच म्हणावी लागेल. परंतु हे केवळ आपल्या मनाच्या चिंतनावर अवलंबून असते. आपण ज्या-ज्या गोष्टींचा विचार करतो किंवा चिंतन करतो त्यावरच या सर्व गोष्टी अवलंबून असतात. बुद्धी हीसुद्धा मानवाला परमेश्वराने दिलेले एक वरदानच आहे. बुद्धी माणसाला विचार करायला भाग पडते. म्हणून बुद्धी ठीक पाहिजे. बुद्धी भ्रष्ट किंवा तामसी नसावी. बुद्धीमध्ये शुद्धी पाहिजे. बुद्धी शुद्ध ठेवण्यासाठी विचार चांगले पाहिजेत, चिंतन योग्य मार्गाने केले पाहिजे, कानांवर नेहमी चांगलेच विचार आले पाहिजेत यासाठी संगत चांगली ठेवली पाहिजे, सात्विक आहार असावा त्यामुळे बुद्धी शुद्ध होते. त्याचबरोबर गुरुसंग असावा. गुरूच मानवाला योग्य दिशा देऊ शकतो. परमेश्वराशिवाय गुरू प्राप्त करता येतो पण गुरूशिवाय परमेश्वर प्राप्त होत नाही. म्हणून प्रत्येक व्यक्तीला गुरू असण्याची गरज असते. गुरूच माणसाला चांगला विचार करण्याची किंवा चांगले जीवन जगण्याची शिकवण देत असतो. वाईट विचारांपासून दूर कसे रहावे याचे मार्गदर्शन गुरूकडूनच मिळते. आपले जीवन सुखी व्हावे असे वाटत असेल तर सर्वप्रथम आपल्या मनातील वाईट विचार काढून टाकले पाहिजेत. कारण वाईट विचारच माणसाला प्रथम मारत असतात. म्हणून वाईट विचार करून स्वत: मरण्यापेक्षा वाईट विचारांनाच मार आणि जे संकट आपल्यासमोर येईल त्याला न घाबरता त्यालाच नष्ट करा.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा, डोंबिवली (प.),
जि. ठाणे

●●●

*हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव. त्यातच माझे सुख सामावले आहे.*

*- एक प्रार्थना.*

# माझी माय सरस्वती

*महाराष्ट्रातील ख्यातनाम ज्येष्ठ कवयित्री प्रा. उषा लिमये - नागपूर यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त - संपादक*

''महाराष्ट्र माझा असे मायदेश
मराठेच आम्ही असू जातीने
मराठीच आहे महाराष्ट्र भाषा
तिच्या वैभवाची करू कीर्तने''
- माय मराठीबद्दल

माझी आई उषा लिमये यांचेच हे गौरोद्गार आहेत. तिच्या वडिलांकडून तिला हा काव्याचा वारसा मिळाला. वयाच्या १२-१३ व्या वर्षापासून काव्य लेखनाला सुरुवात. तिचे वडिल पुण्याच्या ए. पी. कॉलेजात लायब्ररीअन. रहायला क्वॉटरही तिथेच. माझी आई माहेरची द्वारका कोल्हटकर. मग साहजिकच छोटी द्वारका हुजुरपागेत शालेय शिक्षण घेत असतांनाच कॉलेजात जायची स्वप्न बघत होती. पण तिचं त्या काळानुसार अकरावीत गेल्यागेल्याच लग्न झाले. नागपूरच्या श्री. ल. उर्फ राजाभाऊ लिमये या वकिलाशी. मग संसार मुलांमध्ये चौदा वर्षे गेली. लग्नानंतर मॅट्रीकची परीक्षा तेवढी पदरात पडली होती. काव्यलेखन हा तिचा विरंगुळा, छंद होता. लग्नानंतर काही वर्षातच पोट दुखीची व्याधी उद्भवल्यामुळे वकिली करणे माझ्या बाबांना कधीच शक्य झाले नाही. एका प्रायव्हेट कंपनीत त्यांनी तब्येत सांभाळून नोकरी केली. पण पगार बेताचाच, त्यात सारखं आजारपण. पण, आम्ही तीन मुलं नि काव्य लेखन हे जीवनाच्या वैराण वाळवंटातील तिचं ओॲसिस होतं. मासिकांच्या पत्रांची ती तेव्हा अतुरतेन वाट पहायची.

डिग्री शिवाय आपल्या काव्याला मान मिळणार नाही अशी तिची ठाम समजूत होती. शिक्षणाची खूप आवड होती नि संधी १४ वर्षांनी तिला मिळाली. अभ्यास करा म्हणून आमच्या मागे ती सतत लागायची. स्वत:चे रक्त त्यासाठी अटवून घ्यायची. हे पाहून बाबा तिला म्हणाले 'मुलांच्या इतकी सारखी मागे लागतेस अभ्यासासाठी त्यापेक्षा तूच का शिकत नाहीस!' आणि पडत्या फळाची आज्ञा घेऊन ती इंटर झाली बी. ए. झाली, खाजगीरित्या. काही वर्षे चांगली गेली. बाबांची तब्येत ठीक होती. पथ्यपाणी पाळून. मग पाच वर्षांनी आई मराठीत एम. ए. झाली. अत्यंत मेहनत घेऊन ती बेहेरे सुवर्णपदाची मानकरी ठरली. ती विद्यापीठात सर्व प्रथम आली. बाबांच्या व्याधीने पुन्हा डोके वर काढले. आईला डॉ. आंबेडकर कॉलेजात प्राध्यापक म्हणून नोकरी लागली. स्त्री, मनोहर, वाङ्मय शोभा, वसंत, सह्याद्री, युगवाणी या मासिकामधून नेहमीच तिच्या कविता येत होत्या. अधून मधून कविसंमेलनेही चालू होती. दीक्षान्त समारंभात संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते तिला सुवर्णपदक मिळाले. चाळिशीच्या एका बाईला सुवर्णपदक देताना संरक्षण मंत्री सुद्धा कौतुकाने पहात होते. खूप टाळ्यांचा कडकडाट झाला. १९६४ ला ती डॉ. आंबेडकर कॉलेजात लागली नि १९८३ ला मराठी विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाली. सत्यवानाच्या सावित्रीसारखे अनेकदा पतीचे प्राण परत आणले, तिनं तिच्या पुण्याईनं. खडतर जीवन जगली. ती मुलांकडे पहात धीरानं, कष्टानं, स्वाभिमानान.

माझे वडिलही एल्.एल्.बी. ला फर्स्ट क्लास सेंकड होते. तब्येतीने त्यांना दगा दिला. नाहीतर मॅजिस्ट्रेट व्हायचे ते. ते स्वत: उत्तम लेखक. किर्लोस्कर मध्ये वि. स. खांडेकरांच्या कथेला उत्तर म्हणून त्यांनी ''वादळातल्या होड्या'' कथा लिहिली होती. रेडिओवर नेहमीच त्यांच्या श्रुतिका व्हायच्या. 'आता फार उशीर झाला' हे तीन अंकी

नाटक पण त्यांनी लिहिले होते. त्याचा प्रयोग करायचे त्यांच्या मनात होते. ते स्वत: नाटकात उत्तम अभिनय करीत. ऑफिसच्या नाटकात त्यांनी उत्तम कामे केली होती. पण तब्येतीमुळे सर्वालाच उशीर होत गेला. अत्यंत सुस्वभावी, पापभीरू, साधा भोळा जगमित्र देवाधर्मावर विश्वास असणारा सुविद्य, सुसंस्कृत, सज्जन, सालस माणूस. आई जरा रागीट, तापट स्वभावाची. परिस्थितीनेही असेल पण नंबर जरा खाली गेला की रागवायची, चिडायची, मारायची सुद्धा. तेव्हा बाबांच्या पाठी जाऊन आम्ही लपत असू. आम्ही खूप शिकावं म्हणून ती मागे लागायची, रागवायची आणि स्वत:च्या उदाहरणाने तिनं ते सिद्ध करून दाखवलं.

तिच्या इच्छेप्रमाणे आम्ही तिघे शिकलो. माझा भाऊही दहावी परीक्षेत मेरीटला ६ वा तर एम्. टेक्ला पहिला आला. आईला सून खूप चांगली मिळाली. शिकलेली असून (एम्.एस्. सी.) गृहकृत्यदक्ष सालस, सात्विक, सोज्वळ, सुंदर, सर्वांशी मिळून मिसळून वागणारी, सर्वांचा मान राखणारी, दोन्ही जावईही सुविद्य असून सुस्वभावी. धाकटी बहीण नागपूरलाच दिलेली. ती अर्थशास्त्रात एम्.ए. झालेली.

सुप्रसिद्ध नाटककार दिग्दर्शक पुरूषोत्तम दारव्हेकर आमचे सख्खे शेजारी, त्याचं प्रत्येक लिहिलेलं नाटक ते बाबांना वाचून दाखवीत. रात्री दोन वाजेपर्यंतही ही मैफिल रंगायची, दोघही निशाचर होते. त्यामुळे त्यांचे जमायचे. मी छोटी असतांनाच त्यांनी रात्रीच्या रेडिओच्या नभोनाट्यातून मला बालकलाकार म्हणून संधी दिली. आधी शाळेत मास्तर नि मग रेडिओवर ते नोकरीला होते. आईच्या 'विसावा' काव्य संग्रहाची सजावट त्यांचीच. आईची 'विसाव्यातली' 'मज खुशाल हिणवा पत्थर सह्याद्रीचा' ही कविता शाहीर शरद मुठे डफलीवर खूप छान म्हणायचे, त्यांच्या जाहीर कार्यक्रमात.

वडिलांच्या आजारपणामुळे तिचे पी.एच्.डी. राहून गेले नाही तर नक्कीच तिची डॉक्टरेट झाली असती. बेताची परिस्थिती, वडिलांचे आजारपण याच्यामुळे तिच्या साहित्यातील प्रगतीलाही मर्यादा पडल्या. नागपूरात विं. दा. करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट या त्रयींबोबरही तिने कविसंमेलनात भाग घेतलेला आहे. एकदा १९५५-५६ साली पुणे रेडिओच्या कवयित्री संमेलनात इंदिरा संत, संजीवनी मराठे, योगिनी जोगळेकर, शांता शेळके यांच्याबरोबर तिने नागपूरचे प्रतिनिधित्व केले होते. आणि त्याचवेळी सर्व कवयित्री या पदवीधर असलेल्या पाहून तिच्या मनाने आपणही शिकायला हवे, हे घेतले होते; नि ते खरे करूनही दाखवले.

माझी आई आम्ही लग्न होऊन सासरी गेल्यावर अगदी नातवंडे वगैरे झाल्यावर आम्हाला नेहमी म्हणायची, आजच्या मुलांसारखे तुमचे लाड आम्ही नाही पुरवू शकलो. तुम्हाला काही देऊ नाही शकलो. याचं तिला खूप वाईट वाटायच. मी म्हणायची अग साहित्याचा वारसा मला तुम्ही दिलात. ''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने'' ती शब्दांची रत्ने; आकाशतील उडुगणे तुम्ही मला दिलीत अजून काय पाहिजे। तुमच्या पुण्याईने आशीर्वादाने आज आम्ही आमच्या घरी सुखी आहोत. जे तुमच्याजवळ होत ते तुम्ही भरभरून दिलत. प्रेम, माया, शिक्षण, संस्कार.''

आईने माझ्यावर कवितांची सिरिअलच केलीय. परवा असंच सकाळी उठायला उशीर झाला. रात्री लेखन करीत बसल्यामुळे झोपायला खूप उशीर झाला होता. मी बाल्कनीत झोपले होते. फार गर्मी होत होती म्हणून. नि मला इथे झोपायला आवडते. रात्री आकाशाशी, चंद्र, चांदण्यांशी हितगुज करत आखमिचेली खेळत झोपता येतं, त्यामुळे ही माझी झोपायची जागा ठरलेली आहे. उठायला सातच वाजले होते तसे फार नाही. पण अंगावर उन्हं आली होती. नि 'उन्हं आली अंगावरी उठ आशूबाळा' ह्या माझ्यावरील आईच्या कवितेच्या ओळी म्हणतच मी उठले. आईच ह्या ओळी म्हणून मला उठवतेय असा भास झाला.

''काऊ चिऊ उठले कामालागी लागले
साद घालिती तुला उठ आशू बाळा॥''

''खेळतात भालावर केस कुरळे उडोनी
सानुल्या ग आशाराणी घालू देग तुझी वेणी''

त्यानंतर 'आशू निघाली शाळेला', 'आशू निघाली सासरी', अशा कितीतरी कविता तिने माझ्यावर लिहिल्या. अगदी माझे मिस्टर गेल्यानंतरच्या वाढदिवसाला तिने मला कविताच भेट दिली. अगदी ग्रिटींगकार्ड बनवून त्यावर स्वत: चित्र काढून.

''सुख दु:खाचे वार झेलत
असेच पुढे जायचे आहे
जीवनाचा शेला विणत
कबीर मला व्हायचं आहे.''

त्यानंतर या दु:खातून बाहेर यायला मी गीतेचा अभ्यास सुरू केला. नंतर प्रवचने करू लागले. गीतेवर, मग 'सांगे गीता' हे माझे पुस्तक निघाले. त्यावेळी तिने मला काव्यातूनच आशीर्वाद दिले -

''लाडकी ही बाळ माझी सांगे गीता भगवंता
भारावून गेला सारा आसमंत आणि जनता
जसा सुगंधात न्हातो बाग सारा आनंदाने
तसा नाहती गीतेत भाव आत्म संतोषाने
वाटतो अभिमान माझ्या लाडक्या आशालतेचा
शब्द नाही सांगायला मूक होय माझी वाचा.''

रेडिओची ती अधिकृत कवयित्री होती. त्यामुळे रेडिओवर तिची गाणी सतत म्हटली जायची -

''तव विरहाची गीते गाऊन
थकली वीणा थकली वाणी॥''

''आज माझ्या भेटीसाठी पांडुरंग यावा
पांडुरंग यावा त्याने आशीर्वाद द्यावा॥''

''सहस्त्रवर्षे मिटल्या नयनी मूक जाहली होती वाणी
दगडातुन चैतन्य जागता अंतरात उठली उर्मी
बुद्धम् शरणं गच्छामि॥''

''जगा वेगळा याचक आणि जगा वेगळा धनी
मूठभर पोह्यासाठी दिली का सुवर्ण नगरी कुणी॥''

''उठ उठ ग वसुधे सावर पर्णाचा शृंगार
आला वसंत जादुगार॥''

''तो - साजणी आज प्रीतीला अबोली साज।
ती - साजणा आज स्त्री सुलभ जागली लाज॥''

''रंगला कसा ग गालामध्ये माझ्या विडा।
नको लाजुस सखये लावीन त्याचा छडा॥''

त्यावेळी राम फाटक रेडिओवर संगीतकार म्हणून होते. नंतर यशवंत देवांनीही तिच्या गाण्यांना चाली लावल्या. 'दूरी याचक उभा' ही HMV ची तिच्या गाण्याची रेकॉर्ड खूप गाजली होती. तिने रचलेले ''गीत गजानन'' शेगावच्या श्री गजानन महाराजांवरील विदर्भात तर खूप, म्हणजे त्याचे हजारावर प्रयोग झाले व इकडे मुंबईकडे सुद्धा त्याचे अनेक प्रयोग होत आहेत. 'निवेदन रामायण' 'महाभारतातील स्त्रिया' ही एकपात्री नाटके (प्रत्येक पात्र आपलं स्वगत निवेदन करणार) याचेही नागपूर, पुणे, मुंबईत समितीतर्फे प्रयोग झाले व ते गाजलेही.

मुंबई दूरदर्शनच्या कविसंमेलनाचे, वणीच्या वैदर्भिय स्त्री लेखिका संमेलनातील कवयित्री संमेलनाचे व इतरही अनेक कविसंमेलनांचे संचालन व अध्यक्षपद तिने भूषवलेले आहे. तिच्या एकटीचेही काव्यगायनाचे गावोगाव अनेक कार्यक्रम झालेत. नागपूर रेडिओच्या 'राम राम मंडळी' या शेतकरी बंधुच्या ग्रामपंचायत कार्यक्रमात तिचे 'हरभरा पुराण' आधुनिक पुराण 'मारुतीचे लग्न', 'प्रेमाचे भांडण' वगैरे विनोदी काव्ये लोकांच्या खूपच पसंतीस उतरली.

'विसावा' हा पहिला काव्य संग्रह १९५५ ला प्रसिद्ध झाला. सुप्रसिद्ध कादंबरी व कथाकार वि. स. खांडेकर यांची प्रस्तावना व 'यशवंत' डॉ. वि. भि. कोलते, कुसुमावती देशपांडे यांचे अभिप्राय त्याला लाभले होते. या संग्रहातील कौटुंबिक सौहार्दाच्या सगळ्याच कवितांकडे उत्कट जिव्हाळ्याचे सुंदर आलेख म्हणून बोट दाखवता येईल. साध्या, सरळ, आशा आकांक्षाची साक्षीदारीण आहे. मतीची सहजसुंदरता आणि वृत्तीची निरामयता ह्यांचा खास उल्लेख करायला हवा. 'हाय परंतु जगतामध्ये। काव्याला ना कुणी विचारी' असा कवयित्रीचा अनुभव असला तरी मानवी मनाला शुष्क व्यवहारापलीकडची काही ओढ असते अशी ओढ लागलेल्या जिवाला ह्या कवितांत विरंगुळा मिळेल'' असे उद्गार राजकवी 'यशवंत' यांनी 'विसावा' बद्दल काढले.

''मऊ मऊ वाळू वरूनं मजेत चालावे तसा या कविता वाचतांना भास होतो. कुठे क्लिष्टतेचा काटा बोचायचा नाही, कुठे अनुचित शब्दाचा खडा टोचायचा नाही. याचे मुख्य कारण कवयित्रिची प्रसन्न शैली. एखाद्या पुष्करिणीच्या काठी बसून तिच्या स्वच्छ पाण्याचा तळ पहावा तसा या काव्यातील आशयाचा आस्वाद वाचक घेऊ शकतो.'' ह्या आहेत वि. स. खांडेकर यांच्या 'विसावा' च्या प्रस्तावनेतील काही ओळी.

झळ सोसून उन्हाची दिली आम्हास सावली
झाला सुफळ संसार फळे साधनेस आली॥

प्रेम माया वात्सलाची तीन दगडांची चूल
काडी काडी जमवून साकारले घरकुल॥

शब्दांचेच अलंकार शब्दांचीच पकवान्ने
होती खेळण्यास आम्हा आकाशीची उडुरत्ने॥

बाप तुक्या, साक्षात सरस्वतीच माऊली
चाफा, जाई, जुई गोड स्वप्न मळ्यात फुलली॥

प्रपंच नि परमार्थ सुखे संगती नांदती
पाचा मुखी परमेश्वर होता राहिला वसती॥

लाभो दीर्घायु आरोग्य देत सुवास चंदनी
सदिच्छांची ही ओंजळ पदी वाहते वाकुनी॥

(ती. आईच्या पंचाहत्तरीच्या निमित्त ही माझी काव्यभेट)

राष्ट्रसेविका समितीशी आईचा फार घनिष्ट ऋणानुबंध होता. ती लग्नाआधीपासून सेविका होती. काही वर्षे तिने उपाध्यक्ष पदही भूषवले होते. समितीच्या संस्थापिका व मावशी केळकर ह्यांनी काही सुचवावे नि आईने ते लिहून द्यावे. 'निवेदन रामायण' हे रामायणावरील आगळेवेगळे नृत्य नाट्य असेच लिहिले गेले. नि समितीनेच त्याचे नागपूर, मुंबई, पुणे येथे त्याचे प्रयोग गाजवले. मावशीच्या जीवनातील 'समिधा' ही आईने लिहिलेली कादंबरी नुकतीच प्रकाशित झाली आहे. 'महादजी शिंदे' यांच्या जीवनावरील तीन अंकी नाटक, काही एकांकिका, कथासंग्रह, लेख संग्रह, महाभारतातील स्त्रिया, अहिल्यादेवी सोप्या सहजोद्गारातून त्या सहज जीवनाचं गहन तत्त्वज्ञान सांगून जातात -

''दीपावरूनि दीप लावणे
एकाने दुसऱ्यास उजळणे
मुली नियम हा असा
करि घे सुनबाई हा वसा॥''

''नको हाकलूं चिमण्या सुनबाई! अंगणीच्या,
गुंतला ग जीव त्यात तुझ्या सात चिमण्याचा॥

विस्कटेल बाळ जरी डौल तुझ्या स्वच्छतेचा
त्यात गौरव साठला मुली! तुझ्या मातृत्वाचा॥''

''गृहच नव्हे तर संसाराचा
फुलबाग इथे मागे ठेवुन
मागे वळुनी पाहत पाहत
पुढे जायचे काळामागून॥''

---

विवेक प्राप्त करणे म्हणजे आयुष्याचे अर्धे यश प्राप्त करणे.

''नको म्हणू रे व्यर्थ परिश्रम'', ''कशास रडणे जुने आठवून'', 'उरले हे गीत मात्र', 'म्हणोत कोणी मुर्ख कलंदर', 'मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रिचा', 'संध्येच्या झाकळीत', 'असाच राहीन कल्पान्तावर' वगैरे कितीतरी एकाहून एक सुंदर कविता 'विसावा' संग्रहात आहेत.

बेताच्या परिस्थितीत अत्यंत काटकसरीनं आईनं संसार केला. लहानपणी आमचे फ्रॉक ती हाताने शिवायची. आम्ही पण त्यावेळी रस्त्यावर आईसफ्रूटचा हातगाडीवाला यायचा. दोन पैशाला मिळायचे आईसफ्रूट पण आम्ही ते घेण्यासाठी हट्ट न करता म्हणायची 'आम्हाला आईसफ्रूट नको ते पैसे (तिघांचे) आपण आपल्या घरासाठी आमच्या 'मनी बँकमध्ये टाकू या.' आईला नोकरी लागल्यावरही आई कॉलेजात पायी जायची, पायी परत यायची. तसे कॉलेज घरापासून जवळ नव्हते. तरी रिक्षाने न जाता ते पैसे वाचवून ती आम्हाला कधी केळी, कधी पेरू, जांभळे, चिक्कू आणायची. कधी ब्रेड, बिस्किटे, चॉकलेट, गोळ्या आणायची.

सुरुवातीचे दिवस चांगले गेले नंतर वडीलांना पोट दुखीनं ग्रासलं. मग त्यांचा औषधपाणी डॉक्टरचा खर्च सांभाळून घेतलं. त्यामुळे एवढा विपुल काव्य संभार असूनही आईचे दुसरे काव्याचे पुस्तक तिच्या पंचाहत्तरीला म्हणजे १९९७ ला निघाले. 'पालखी' हा तिचा दुसरा काव्य संग्रह. त्याचवेळी 'गीत गजानन' दुसरी आवृत्ती 'इरिंग मिरिंग लौंगा तिरिंग'' (बालगीते) 'पाळण्यापासून पाळण्यापर्यंत' अशी चार पुस्तके निघाली. पालखीतल्या ह्या काही कविता.

''अशी एकदा लिहीन कविता
विश्वज्यात निजरूप न्याहळील
युगायुगांची व्यथित वेदना
निजस्पर्शाने क्षणात जाळील॥''

किंवा

''उन्मनीत वावरते मी तूर्येत मला विश्वान्ती।
मी पणीच नुरले आता मग कुठली राहिल भ्रान्ती॥''

किंवा

कशासाठी अशी। तुवाच ईश्वरा।
बांधीलीस कारा। माझ्यासाठी॥
जर माझा वंश। त्यात तुझा अंश।
मग का हा दंश। विषवाही॥

किंवा

''मी माझी असते अन् मी माझी नसतेही
शब्दाच्या मायेने भावब्रह्म फसतेही॥''

किंवा

''जन्म  द्यायचा असेल तर मग
महीष मी पैठणात होईन।
वरदहस्त ज्ञान्याचा मिरवीत
वेदांचे मी करीन गायन॥''

''जन्म घायचा असेल तर मी
भिंत बनावे जुनी पुरातन।
ज्ञानेशाच्या पुण्याईने
निर्जिननाही व्हावी पावन॥''

किंवा

बेभानीच्या बेहोशीत वेड मन फसते आहे
पालखी मधलं परब्रह्म तुला मला हसते आहे
झाकळलेल्या बाळमुठीला सुखदु:ख सारखीच
साळुकी साळकी तुझी माझी पालखी...

''रक्ताने न्हाली इतिहासाची पाने' या कवितेला राष्ट्रपती पुरस्कारही मिळालेला आहे. इतरही अनेक पुरस्कार काव्याला मिळालेले आहेत. तिची जन्मभूमी कोकण. १९२३ साली आंजर्ले येथे जन्म. विदर्भ ही कर्मभूमी. पण

निवृत्तीनंतरची वर्षे मुलगा मुंबईत म्हणून मुंबईत गेली. २३-२४ वर्षे वास्तव्य. अत्यंत विद्वान असूनही निगर्वी स्वभाव.

माझ्या सानुल्या घरात।
सदा मोक्षाची चाहूल॥

जरी नाही उमटले।
कधी लक्ष्मीचे पाऊल॥

झोपडीचाहि वाटेल।
थोर प्रसादाला हेवा॥

काय याहून मागावे ।
तुझ्या पायापाशी देवा!

''काय याहून मागावे'' ही त्यांची कविताच त्यांच्या संयमित विवेकी होळकर यांच्या जीवनावरील लघू कादंबरीका अग्निदिव्य, गीत दत्तात्रय, भुलाबाईची आधुनिक गाणी, मृत्यूंजयाची गाथा अर्थात् गीत सावरकर दोन काव्य संग्रह, भावगीत भक्तीगीत संग्रह, दोन बालगीत संग्रह, विनोदी काव्यसंग्रह अशी सर्व प्रकारची पुस्तके शारदा प्रकाशन तर्फे लवकरच प्रसिद्ध होत आहेत. तिच्या समोर निघू शकली नाहीत, पण तिच्या पहिल्या स्मृती दिनी तिला भावश्रद्धांजली म्हणून तिच्या मुलाने तिचे जास्तीत जास्त साहित्य प्रकाशित करून वाहिली आहे. त्याची तिच्या समोरच सुरुवात झालेली होती.

चौऱ्यांशी वर्षाचे आयुष्य सुरुवातीला अत्यंत खडतर गेले तरी शेवटी निवृत्तीनंतर अत्यंत सुखा समाधानात, मुला, नातवंड, पतवंडात गेले. पुढचा जन्म मिळायचाच असेल तर उषा लिमये म्हणूनच आवडेल असं ती म्हणायची. नागपूरच्या 'विदर्भ साहित्य संघ' म्हणजे साहित्यिकांची मांदियाळीच होती. प्रा. भ. श्री. पंडित, प्राचार्य पाठक, प्राचार्य राम शेवाळकर, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, ग्रेस, प्रा. श्रीधर शनवारे या सर्व कविवर्यांसह त्यावेळी अनेक कविसंमेलने, साहित्यसंमेलने रंगलेली आहेत.

जोवरी विभव रवि मध्यान्ही आलेला
कीर्तिचा चंद्रमा झळकतसे पुनवेला
ओहोट जोवरी लागली न सुयशास
तोवरी कृन्ताता टाक आपुले पाश॥

लेकरे सुना अन् नातवंड भवताली
मी हवी हवीशी तयास सांजसकाळी
जोवरी न माझी अडगळ त्या सर्वास
तोवरी कृतान्ता टाक आपुले पाश॥

जे युगायुगांचे कर्तव्य तुझे ठरले
संहार हेच त्वा ध्येय जीवनी वरिले
मग मीच कोण? मज नको दयेचा घास
तू टाक कृतान्ता खुशाल आपुले पाश॥

कविसंमेलनात हमखास गाजणारी तिची ही कविता तिच्या स्वत:च्या बाबतीत खरी ठरली. तिची तब्येत चांगली होती. शेवटपर्यंत ती कार्यरत होती. सर्वार्थाने कृतार्थ जीवन ती जगली. रसिकांचे, मुला, नातवंडांचे प्रेम तिला भरभरून मिळाले. आणि अगदी अलगद कृतान्ताने तिच्यावर पाश टाकले. शांत गाढ झोपल्यासारखा तिचा चेहरा दिसत होता. सुखी समाधानी.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

*एक विचार*
*पाणी अमूल्य आहे; जपून वापरा.*

# मुक्ताई

*संत कवयित्री मुक्ताबाई यांचा हा परिचय. -संपादक*

मुक्ताई ही ज्ञानेश्वरांची सर्वात धाकटी बहीण मराठी संत कवयित्री म्हणूनही ज्ञात आहे. चारही भावंडे संन्याशाची मुले म्हणूनच समाजाकडून उपेक्षिली गेली. असे असूनही या चारही भावंडांचे जीवन उज्ज्वल स्वरूपाचे होते. मुक्ताईचा कालखंड अत्यल्पच आहे. (१२७७ ते १२९७) या अल्प कालावधीत मुक्ताई विजेच्या प्रकाशाप्रमाणे चमकून गेली.

**तिच्या जीवनातील विशेष प्रसंग :**

चांगदेवाशी गुरुच्या नात्याने आलेला संबंध आणि भक्त नामदेवाचे मडके कच्चे ठरवून त्याला आत्मज्ञान करून घेण्यास संधी प्राप्त करून दिली.

ज्ञानदेवांच्या भेटीसाठी येण्यापूर्वी चांगदेवांनी त्यांना कोरे पत्र पाठविले. या घटनेवरून चांगदेवास अनुलक्षून तिने 'चांगदेव इतकी वर्षे जगून कोराच्या कोरा राहिला आहे' असे म्हटले. तोच चांगदेव पुढे तिचा शिष्य झाला. हा गुरू शिष्य संबंध दोघानीही आपआपल्या अभंगांतून व्यक्त केला आहे.

मुक्ताबाईच्या जीवनातली दुसरी विशेष गोष्ट म्हणजे तिने ज्ञानदेवाच्या भेटीस आलेल्या अहंमन्द नामदेवाचे अज्ञान उघड केले. त्याप्रसंगी जाणवलेली तिचे प्रभावी व्यक्तिमत्त्व पाहूनच नामदेव म्हणतात.

लहानगी मुक्ताबाई जशी सणकोडी।
केले देशोधडी महान संत।

पुढील काळात नामदेव व चांगदेव या उभयतांनी तिच्याबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. मुक्ताई आपल्या भावंडांच्या जीवनाशी समरस होऊन गेली होती. चारही भावंडांची चरित्रे सारखीच आहेत असे म्हटले तरी चालेल. ती निवृत्ती नाथापेक्षा लहान परंतु त्यांच्या पूर्वी खानदेशात मेहूण ग्रामी शके १२१९ (१२९७) वैशाख वद्य १२ या दिवशी ती समाधिस्थ झाली.

**मुक्ताईचे अभंग :**

मुक्ताईच्या नावे एकूण ४२ अभंग आहेत. मुक्ताईच्या काव्यात तिच्या जीवनाचे व प्रतिभेचे अनेक पैलू उठून दिसतात. मुक्तपणे मुक्त। मुक्ताई पै शा। हरिनाम स्मरत। सर्वकाळ। अशी आपली अवस्था होऊन गेल्याचे ती सांगते. तिच्या अभंगात योग्याच्या खुणा आहेत. अध्यात्माची उंची आहे. साक्षात्काराचे पडसाद, हृदयाचे मार्दव, आणि भावनेची हळुवारता आहे.

**ताटीचे अभंग :**

एक दिवस ज्ञानोबांना कोणी संन्याशाचे पोर म्हणून हिणविले. तेव्हा ज्ञानदेव मनात खिन्न झाले आणि झोपडीचे दार लावून बसले. काही केल्या ताटीचे दार उघडीनात. त्यावेळी मुक्ताबाईने त्यांचा ज्या विनवण्या केल्या त्या ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यात रुसलेल्या वडील भावावर धाकट्या बहिणीचा लडिवाळपणा आहे. तसाच परिणत प्रौढत्वाला साजेल असा समंजसपणा देखील आहे.

**काही गूढ अभंग :**

मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्याशी। असाही एक गूढ अभंग आहे. वयाने लहान असली तरी

इतर संपन्न भावंडांची बहिण म्हणून शोभावी अशीच तिची आध्यात्मिक क्षेत्रातील योग्यता आहे. हे तिच्या अभंगवाणीवरून सहज दाखविता येण्या सारखे आहे. तिच्या लेखनात भावनेचा आदेश किंवा श्रद्धेचा भाबडेपणा या गोष्टी आढळत नाहीत. मुक्ताईच्या अनेक अंभगाचे सहज उलगडणे कठीण जाईल एवढी त्या अभंगांची उंची आहे.

**एक प्रसंग :**

एकदा आपल्या भावासाठी मांडे करायला गावात कोठे मांडे पात्र (परळ) मिळेना. विसोबाचाटीच्या आडकाढीने कोणी कुंभार तिला परळ देईना. अखेर या लाडक्या बहिणीसाठी ज्ञानेश्वरांनी जठराग्नी प्रदीप्त केला. त्यावर मुक्ताईने मांडे भाजले.

**चांगदेव :**

योगिक सामर्थ्याने मृत्यू चुकवून १४०० वर्षे चांगदेव जगले. लौकिक मोठेपणात योग विद्या जोपासणारे चांगदेव ज्ञानेश्वरांना कोरे पत्र पाठवितात. ज्ञानदेव निवृत्तींच्या सांगण्यावरून त्यांना पासष्ट ओव्यांचे उत्तर पाठवितात. मात्र मुक्ताई हा अद्याप कोराच राहिला असा रोख ठोक अभिप्राय व्यक्त करते. हीच मुक्ताई त्याला - वरेश्वर चांगा-अवघाचि आहे। अवघे तसी पाहे वटेश्वरी। ही पिंडब्रह्मांड ऐक्याची जीव शिवाच्या अभिन्नत्वाची अपूर्व प्रचिती देते. मुक्ताईच्या अभंगात साधना दिधली चांगयासी असा उल्लेख येतो. चांगदेवाच्या ४६ अभंगांतून २१ अभंगात मुक्ताईचा उल्लेख आढळतो.

वटेश्वर चांगा अवधूत। मुक्ताई शांतवीत ज्ञान दृष्टी।
मुक्ताई कडे लेईले अंजन। चांग्या निधान अखंडीत राही।
वटेश्वर सुताने बोले मुक्ताई। सोहंभावे अखंडित राही।

असे मुक्ताई व चांगदेव यांच्यातील गुरुशिष्य नाते आहे. चौदाशे वर्षाचे चांगदेव १४-१६ वर्षाच्या मुक्ताईला माऊली मानून स्वत:ला तिचे अर्भक समजतात.

निर्गुणाचे उऽहाळी लाविला पाळणा।
तेथे सुत पहुडिला मुक्ताईचा।

हा अव्यक्त विणलेला पाळणा अपूर्व, अनुहत ओवी गाणारी मुक्ताई अपूर्व तसेच तिच्यावर अनन्य भक्तिभाव असणारा पुत्र देखील अपूर्व.

नामदेवांच्या चांगदेव समाधी यातील अभंगातही उल्लेख आढळतो.

मुक्ताबाई योगे उतरलो भव सिंधु। अज्ञान केले दुरी मुक्ताईने।
केला आदेश मुक्ताईने। कृपावंत झाली तेव्हा मुक्ताबाई।
स्वरूप दिशा दाही दाखविले।

असा उल्लेख चांगदेवांच्या तोंडी अनेकदा आलेले आहेत. चांगदेवासारखा महान योगी मुक्ताईचा गौरव पूर्ण असा उल्लेख करतो यावरून तिचा आध्यात्मिक अधिकार किती मोठा असला पाहिजे याची साक्ष पटते.

चांगदेवाप्रमाणे नामदेवाचा गर्व परिहार करून त्यांना गुरु कृपेने -

दगडाची मूर्ती मानिला ईश्वर। परी तो साचार देव भिन्न।
प्रस्तराचा देव बोलला भक्ताने। सांगते ऐकते मूर्ख दोघे।

हा भाव जागा करून देवावीण ओस स्थळ नाही. भक्ति हेचि भावे। परब्रह्म पक्वान्ने। गुरुमुखे जेवण जेवियेले। असा प्रत्यय आणून द्यायला कारण मुक्ताईच ठरली.

**तो प्रसंग असा घडला :**

एकदा सारी भावंडे पंढरीला जातात. नामदेवांचा मुक्काम विठोबा जवळच. सर्वजण विठ्ठलानंतर नामदेवांनाही नमस्कार करतात. ते मात्र कोणाला वंदन करीत नाहीत. आपली योग्यताच तशी असल्याचे नामदेवांना वाटे. आपल्या भावंडाशी याने असे औद्धत्याने वागावे हे मुक्ताईला आवडले नाही. निवृतीनी तिला समजाविले. पण व्यर्थ,

गोरोबांचे हस्ते हे मडके कच्चे आहे असे ठरविले.

**मराठीतील गुणसमृद्ध संत कवयित्री काव्य :**

मराठी वाङमयात गुणसमृद्ध अशी रचना अनेक प्रथितयश कवयित्रींनी करून ठेविलेली आहे. त्यामध्ये महदंबा (महानुभव पंथ) जनाबाई, कान्होपात्रा या तीन कवयित्री मुक्ताईच्या थोड्या फार फरकाने पुढे मागे होऊन गेल्या. धवळे आणि मातृका रुक्मिणी सैंवर या दोन रचना करणारी महानुभव पंथीतल महदालसा (महदंबा) आद्य मराठी कवयित्री म्हणून प्रसिद्ध झाली आहे. या दोनही रचना अभंग सदृश असून येथे महदंबा कृष्ण रुक्मिणी यांचा विवाह सोहळ्याच्या वर्णनात रंगून गेलेली दिसते.

**जनाबाई :**

नामयाची जनी आपल्या प्रेमळ अभंगवाणीमुळे मराठी भाषिकांच्या मनात कायमचे स्थान पटकावून बसली आहे. कै. आजगांवकर, संत चरित्रकार, म्हणतात - अभंग रचणाऱ्या सर्व जुन्या कवीत जी योग्यता तुकारामबुवांची तीच अभंग रचणाऱ्या संत कवयित्री जनाबाईची. नामदेवासारख्या परिसाचा स्पर्श झाल्याने जनाबाईच्या परित्यक्त जीवनाला कृतार्थता लाभली आहे. दासीपणाचे दु:ख जनाबाईने काही शब्दांतून फार आर्ततेने व्यक्त केले आहे. पंढरीच्या विठुरायाला आपला सखा मानून तिने केलेले प्रेमाचे व एटक्या रागाचे हितगुज मराठी भाषेत तरी अद्वितीय आहे.

**कान्होपात्रा :**

गणिका म्हणून जीवन कंठण्याचे दुर्दैव हिच्या वाटेला आले होते. बेदरच्या बादशहाला आपले मनाविरूद्ध रूप लावण्य अर्पिण्याऱ्या तिच्यावर घोर प्रसंग ओढवला होता. त्यातून ती पांडुरंगाच्या कृपेने मुक्त झाली. मात्र तिच्या अभंगातून संपूर्ण करुणा पसरली आहे. गेयतेच्या दृष्टीने तिचे अभंग अधिक गायनानुकूल आहेत. गणिका घराण्यात जन्मल्यामुळे संगीताचे संस्कार बालपणापासूनच झाले होते. तरी देखील तिचे अभंग भक्ती रसाने ओथंबलेले आहेत.

**संत बहिणाबाई व संत वेणाबाई :**

संत तुकोबा शिष्या बहिणाबाई आणि समर्थ रामदासांच्या शिष्या वेणाबाई या समकालीन. 'ज्ञानदेवे रचिला पाया' ही अमर अभंगवाणी बहिणाबाईंची मानली जाते. पण त्याहीपेक्षा तिच्या विपुल अभंग रचनेत समाविष्ट असलेली तिची आत्मकथा साऱ्या मराठी वाङमयात अद्‌भुतरम्य वाटावी असे तिचे स्वरूप आहे.

समर्थ शिष्या वेणाबाईची सारीच रचना स्त्री सुलभ मार्दव आणि हळुवारपणा या गुणांनी नटलेली आहे. विविध स्फुट रचनेपेक्षा वेणाबाईनी रचलेले सीता स्वयंवर मराठीतील साऱ्या स्वयंवर आख्यानात आपल्या वेगळेपणाने उठून दिसणारे आहे.

या विविध कवयित्रींच्या मालिकेत विराजमान व असलेल्या संत मुक्ताईचे काव्य या साऱ्या जणीपेक्षा अगदी भिन्न प्रकारचे आहे. जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई यांना ज्या प्रकारच्या आपत्तीशी झगडत आत्म कल्याणाचा मार्ग शोधावा लागला त्या सर्वांचे स्वरूप, मनोधर्म एकाच प्रकारचे होते असे नाही. तरी देखील कवितेचे स्वरूप विविध झाले आहे. सर्व जणींनी आपल्या जीवनात देवाला आपलेसे करून घेतले आहे आणि आत्मानंद हेच जीवनाचे साफल्य मानले आहे.

**मुक्ताईचे जीवन :**

मुक्ताईचे जीवन लहानपणापासूनच जगावेगळे होते. चारचौघींना कौटुंबिक जीवनात जी लहान सहान सुखे मिळतात त्यांनाही मुक्ताई पारखी झाली होती. जन निंदेचे आघात झेलीतच मुक्ताई व तिची इतर भावंडे जीवन कंठत होती. मात्र या संघर्षाचा पुसटसा देखील निर्देश मुक्ताईच्या अभंगात सूचित झालेला नाही. दाहक चटक्यांची

यत्किंचितही जाणीव मनात न ठेवता आत्मानंदाचे शाश्वत शद्वरूपच श्रोत्यांच्या समोर ठेविले. आपल्या कष्टमय जीवन जगण्याला भाग पाडणाऱ्या समाजाबद्दल एकही कडवट शब्द या भावंडांच्या लेखणीतून बाहेर पडला नाही. अन्य कवयित्री व मुक्ताई यांच्या आत्माविष्कारातील भिन्नता मनावर ठसल्या खेरीज राहत नाही.

**अभंगांतील वैशिष्ट्य :**

वरील कवयित्रींच्या एकीच्याही काव्यात न दिसणारी आध्यात्मिक विचारांची झेप केवळ एका मुक्ताईच्या अभंगवाणीत आहे. वैचारिक प्रगल्भतेच्या दृष्टीने कोणतीही कवयित्री मुक्ताईशी बरोबरी करू शकत नाही. या सर्व कवयित्रींच्या वाणीत भक्तीचा महिमा आहे, सद्गुरू महती आहे, उपास्य देवते विषयीचा भाव आहे, परंतु पारमार्थिक सृष्टीतील अनेक गूढ विचारांचे प्रकटन आणि प्रतिपादन मुक्ताई खेरीज कोणीही केले नाही.

मुक्ताईच्या नावावर सामान्यपणे ४२ अभंग आहेत. तिचा काव्य प्रपंच इतर कवयित्रीच्या मानाने अल्प आहे. संख्येवरून काव्याची योग्यता ठरविता येत नाही. मात्र पारमार्थिक सृष्टीतील तिचा अधिकार मोठा आहे हे मान्य करावेच लागेल.

ती वयाने लहान असली तरी इतर संपन्न भावंडांची बहिण शोभावी अशीच तिची आध्यात्मिक क्षेत्रातील योग्यता आहे. चांगदेवासारख्या १४०० वर्षे परमार्थात वावरणाऱ्या पुरुषानेही तिच्या समोर नतमस्तक व्हावे असा तिचा अधिकार होता. प्रौढ विचारांचा संथ प्रवाह तिच्या लेखनातून विशेष आढळतो. सुजाण वाचकालाही सखोल चिंतन करायला लावील अशा काव्य पंक्ती मुक्ताई सहज लिहून जाते. सामान्य भाविकांना अशा अभंगातील परमार्थ बोध सहज आकलनीय नसला तरी विचारी उपासकाळातील रहस्य उलगडण्यातच परमानंद झाल्याशिवाय राहात नाही.

मुक्ताईच्या अल्पशा जीवनाचा विचार केला असता एवढी परिपक्वता तिने केव्हा संपादन केली याचे आश्चर्य वाटते. तिच्या थोड्याच अभंगावरून तिच्या परिणत प्रज्ञ अवस्थेचे दर्शन घडते व ते मराठी भाषेतील संत कवयित्रींच्या परंपरेतील तिचे असामान्यत्व सिद्ध करण्यास पुरेसे आहे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

### सुवर्णाक्षरातील नोंद



बोट मार्सेलिस बंदरात उभी होती. समोर फ्रान्सचा किनारा. बोटीच्या पोर्टहोलमधून सावरकरांनी समुद्रात उडी घेतली आणि फ्रान्सच्या किनाऱ्यावर पोहोचले. भारतीय स्वातंत्र्यसमराच्या इतिहासात ही उडी सोनेरी अक्षरांमध्ये लिहिली गेली आहे.


या वर्षी उडीचं शताब्दी वर्ष सुरू होत आहे. ८ जुलै हा तो दिवस होता!

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*या विषयावरील लेखांत आलेल्या विचारांचा मागोवा जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २००९ च्या अंकात घेत आहोत. यातील पुढील भाग सप्टेंबर २००९ च्या अंकात समाविष्ट केला जाईल - संपादक*

**जून २००७ पृष्ठ क्र. २१-३१ :**

पृष्ठ क्र. २१ - **मूर्ती, प्रतिमा व प्रतीके - Clsah of Symbols**, वसुंधरा राजे अन्नपूर्णा देवी, पंजाबातील ढाबा, जुरमिन राम रहीम सिंग - 'सच्चा सौदा, एम्. एफ्. हुसेन, सरस्वती -



**जुरमिन राम रहीम सिंग**

माधुरी दिक्षीत. स्वीडन मधील महंमद पैगंबरचे व्यंगचित्र, सलमान रश्दी - Satanic Verse, अभिताम बच्चन - देवाचा अवतार, फार्मर, नरेन्द्र दाभोळकर, डॉ. जयंत नारळीकर पुण्याच्या सायन्स इन्स्टिट्यूट मधील न्यूटनचा पुतळा - अंधश्रद्धा - विज्ञान निष्ठा

पृष्ठ क्र. २२ - **प्रतीकांचे संघर्ष युद्ध Earnst Cassier (1874-1945) फिलॉसॉफर - The Philosophy of symbolic** forms (1923) Receptor system - Effector system symbolic system

पृष्ठ क्र. २३ - राष्ट्रध्वज - राष्ट्रीय अस्मिता

पृष्ठ क्र. २४ - **सुसान लँगर** Susanne Langer "Feeling and form" - A Theory of Art, Developed from philosophy in a Newkey (Routedge and kegan Paul London -1953.)

Shaping inner Life, Gestalt



**सुसान लँगर**

(German word) discursive knowledge बुद्धी प्रामाण्य व वादविवाद या मार्गाने - ज्ञान **ब्रेट बॅटे** (Bret Battery) - "In contrast, I am inclned to acknowledge and honour the existence of knowledge that cannot be

expressed directly in prose" - तिचे एक पुस्तक "Language gesture and music"

**गेस्टाल्ट व्हयू,** बर्लिन स्कूल, Holistic, ज्ञान Atomistic नसते (Digital)

पृष्ठ क्र. २७ - **Emergence, Reification, Invariance Multistability, 1) Principle of Totallity 2) Principle of psychophysical homorphism.**

असे अनेक नियम हे मानवी मनाच्या स्थायी 'रचनायंत्राचा' अविभाज्य भाग आहेत.

पृष्ठ क्र. २८ - **भारतीय संस्कृतीतील विचार काश्मिरी 'छंदशास्त्र', Doctrine of Vibrations**

**डॉ. सत्यप्रकाश सरस्वती (आर्य समाजिस्ट)**

**'संहिता तर्क', 'रूपक तर्क' Collative Parallelism**

Forms व मानसिक व्यूह. व्याहृती, अधिलोक, अधिज्योतिश अधिविद्या, अध्यात्म

**श्री. एच्. एन्. रामस्वामी. तैतरिय उपनिषद** भारतीय विद्याभवन - प्रस्तावना करणसिंग यांची, विश्वातील अदृश्य अशी Life Energy चैतन्यशक्ती ज्या पद्धतीने 'forms' निरनिराळ्या जड व चैतन्यपूर्ण अशा रूपांना निर्माण करते - त्या रूप, forms आणि symbols ना नियंत्रण व कार्यप्रवण करण्याचे नियम व यंत्रणा 'तैतरीय उपनिषद शिक्षावल्ली' मध्ये सागंत आहे.

विश्वाच्या निर्मितीत जे चैतन्य, फॉर्मस निर्माण होतात, त्यांना रंग, रूप, अहंभाव, मर्यादा, स्वसंवेद्यता (स्व जाणीव), स्वतःच्या फॉर्मचे अधिक नक्कल फॉर्मस्, करण्याची क्षमता, ह्या बंदिस्त फॉर्मच्या बाहेर Becoming, Transcendence करण्याची क्षमता आहे, याचे दर्शन घडेल.

**जुलै २००७ पृष्ठ क्र. १०-१७ :**

सोनिया गांधी - दुर्गा देवीच्या स्वरूपात,

**म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, राजीव गांधी, इंदिरा गांधी व सोनिया गांधी यांचे 'पंचमुखी नेतृत्व' दाखविणारे चित्र**



Ernst Cassier - "Man is a symbolic Animal माणूस हा प्रतिकांचा प्राणी आहे.'' The interpretation of the symbol, then is down to the intelligence and sensitivity of each one of us, through an inner quest, which lead us to find, in ourselves, our microcosom."

दुर्गम भारतीय ज्ञान - 'भूमी' कल्पना स्पिरीच्यूअल अर्थाने आहे. 'कुरूक्षेत्री' प्रश्न तयार व्हावा लागतो व 'धर्मक्षेत्री' त्याचे उत्तर मिळते व क्रिया घडावी लागते.

साक्षात्कारी ज्ञान पद्धती - Synthesis grounded intutive knowledge (pure transcendental intellect)

Human (Embodied consciousness) form 'चैतन्य यंत्र'

ज्ञानाचा पहिला धडा - First cause of knowledge हा 'वेद' ह्या 'चीजे' पासूनच मिळाला.

पृष्ठ क्र. १६ - प्रतीक व प्रतिमा मधील फरक.

पृष्ठ क्र. १७ - 'कुंडलिनी जागृती' व अधिकार ही ज्ञानमार्गातील पायरी.

**सप्टेंबर २००७ पृष्ठ क्र. २५-२८ (part) :**

पृष्ठ क्र. २५ - भारतीय संस्कृती ही कवींची निर्मीती.

कवींनी अतिदूरच्या भविष्यकाळाचा वेध घेतला.

आक्रमक व धर्मोपदेशक केवळ जवळचा आसमंत आणि वर्तमानकाळ पहातात.

कवी कोण? (Visionary) द्रष्टा seer of Truth कवय: सत्यश्रृत: वेदांनी सांगितलेले (गायलेले) 'सत्य', हे श्रृती म्हणून ओळखले जाते. त्याचा अर्थ 'Revealed Truth' असा आहे.

देवभाषा - (संस्कृत) १४ नादांवर रचलेली 'माहेश्वरी सूत्रा बरहुकूम'

ज्ञानाची पद्धती सुद्धा '<u>संस्कृतीबद्ध</u>' तार्किक पद्धतीने बांधलेली असते.

पृष्ठ क्र. २६ - विज्ञानम्, प्रज्ञानम, संज्ञानम्, आज्ञानम् ५ शरीर कोष - अन्न, प्राण, मन, विज्ञान, आनंद, काष्मशरीर, सूक्ष्मशरीर, स्थूल शरीर, हिरण्यगर्भ, विश्व, विराट

पृष्ठ क्र. २७ - **श्री. अरविंद महायोगी - 'बृहद् अरण्यक उपनिषद'** (भाष्य)

प्राचीन ऋषींच्या विचार समूहांत नम्रभावाने प्रवेश करणे

त्यांचे शब्द आपल्या अंतरंगात मुरूं देणे

त्या शब्दांना आपल्या अंतरंगात आकार देणे

अनुकूल आणि प्रतिसंवेदनाक्षम द्रव्यांत त्या वेदवाणीचे प्रतिध्वनी घुमूं देणे

ही ती प्राचीन ''ज्ञानग्रहण'' पद्धती होय.

**''गिरां उपश्रुतिचर, स्तोमाम् अभिस्वर, अभिगृहीहि आ रुवा**

''आपल्या अंतरात्म्याचे कान करून त्या प्राचीन वाणीने श्रवण करणे आणि

अंतरात्म्यात स्फुरणाऱ्या श्रुती वेदान्तरूप ज्ञानसुक्ताला प्रतिसाद, प्रतिध्वनी देतीलसे करणे

क्रमश: कंपायमान होऊ देणे आणि

त्यांच्या प्रतिसादांमध्ये अधिक स्पष्टता, तीव्रता आणि परिपूर्णता आणणे

ही विशदीकरण पद्धती मी अवलंबली आहे.

प्राचीन वेदान्ती ऋषी, माझ्या मते, गूढवादीच होते.

पण, भाषेत भोंगळ आणि विचारात सैल असे 'स्वप्नाळू लोक' अशा अर्थाने नव्हे तर,

अंत:प्रेरणामार्गी प्रतीकवादी या अर्थाने, मी त्यांना गूढवादी मानतो.

'**Intutional Symbolists**' ह्याचा माझा अर्थ असा की, ते ऋषी, सर्व जगत् ही चैतन्याची एक चेष्टा एक व्यापार मानीत, आणि सर्व जड (नामरूपात्मक) आकृतींना आणि जड शक्तींना ते गूढ, गूढतर अन्तर्हित सद् वस्तूंच्या छाया आणि प्रतीके मानीत.''

पृष्ठ क्र. २७ - अश्वमेध व बृहरअरण्यक प्रेरित अर्थ गौतम बुद्धाच्या काळापूर्वीच 'अश्वमेध' यज्ञाचा खरा बोध नाहीसा झाला होता.

**'अश्वमेध यज्ञ' म्हणजे 'अध्यात्ममार्गातील (Spiritual Evolution) एक मोठा पल्ला म्हणून मानण्यात आला आहे.'**

हा यज्ञ म्हणजे जणू काय ही प्राय: जड अशा शक्तिच्या राज्यातून उच्च आध्यात्मिक मुक्ततेच्या प्रांतात होणारी उत्क्रांतमय प्रगतीच होय.

**Symbolism of Ashvamedh**

**रूपकांचा वर्षाव**

**ऑक्टोबर २००७ पृष्ठ क्र. ५-९/२४ :**

पृष्ठ क्र. ५ - **महायोगी अरविंद** म्हणताहेत, **ही सर्व रूपके उपनिषद कर्त्यांच्या** स्वैर कल्पनेवर आधारलेली नसून, प्राचीनतर, वेदान्तातील सर्वमान्य साक्षात्कार कल्पनांवर आधारलेली आहेत.



**महायोगी अरविंद**

**डॉ. सुभाष काक** हे अँटोनियो निकोलास ह्यांच्या (भाष्या) कडे लक्ष वेधतात

The Rigveda - one must take it as a linguistic whole with four languages of


१) Non - Existence (असत्)

२) Existence (सत्)

३) Images and Sacrifice (यज्ञ)

४) Embodied (ऋत) Vision (धीः)

These four languages function as four spaces of discpurse, four ways of viewing the world, within which human action takes place and from which any statement in the text gains meaning.




**'अश्वमेध' खरा अर्थ?**

The different languages of the Rigveda address the four different aspects of our reality.

1. Physical existence
2. Mind, Consciousness, spirit
3. Transformation, and
4. Embodied Vision.

पृष्ठ क्र. ७ - **केनोपनिषद व ऐतरेयोपनिषद** Sense, however,is not or does not appear to be fundamental, it is only an instrumention of mind using the nervous system.

पृष्ठ क्र. ८ - **'देवात्मशक्तिम् स्वगुणौनिगूढाम'** Self-power of the Divine existent hidden by its own modes. - श्वेताश्वर उपनिषद (१.३)

पृष्ठ क्र. ९ - **अशनाया मृत्यू : -** ही माया-अपूर्णता दर्शनाची कल्पना होय. लहान माशाला मोठा मासा खातो. एकाचे खाद्य - दूसऱ्याचा मृत्यू!! खरोखरी आपल्यातील 'मर्त्य अंश' हा मूलद्रव्याच्या दृष्टीने, आपल्यील अमर्याद आणि अमर्त्य अशा अंगाचा बांधवच ठरतो.

'परार्थ व अपरार्ध संबंध', ध्यानात ठेवावयाला हवा. अपरार्ध हा मूलतः परार्थाच्याच जातीचा ठरतो. **हा 'विश्व-अश्व' मानवाकरिता घोडा नव्हे 'अश्व' बनतो.**

पृष्ठ क्र. २४ - Cosmic Wisdom ही **'अश्व'** symbol आपल्याशी बोलू शकते. व

त्या मार्फत केवळ अश्वाबद्दलच नव्हे तर ह्या गूढ विश्वाच्या रचना व अंतर्भूत **शहाणपणा, ज्ञान, आत्मज्ञान** प्राप्त होऊ शकते. हे अध्यात्म आहे.

**नोव्हेंबर २००७ पृष्ठ क्र. २३ :**

पृष्ठ क्र. २३ - What is reality in culture? सांस्कृतिक इतिहास रामायण, रामसेतू

"Reality is what we take it to be True!!"

पृष्ठ क्र. २६ - राजवाडे - विवाह संस्थेचा इतिहास - कॉ. डांगे यांची प्रस्तावना

पृष्ठ क्र. २७ - योगी अरविंद व सोम - सूर्या विवाहाचे प्रतिक

पृष्ठ क्र. २८ - भौतिकवादी चष्म्यातून इतिहास, कॉ. डांगे यांचे 'अर्धसत्य'

पृष्ठ क्र. २९ - वेदातील स्त्री-पुरुष नाते, ऋग्वेद **सूर्या - सोम विवाह** R.V. 10.85 (1-47) सातवा अनुवाद) वगैरे

**डिसेंबर २००७ पृष्ठ क्र. ७ - १४ :**


यज्ञं भारतीय संस्कृतीचा आधार **डॉ. रामनाथ वेदालंकार**, विद्यामार्तंड M.A. ''यज्ञ भारतीय संस्कृतीका प्राण है''

आर्य मानव जब माता के गर्भ मे होता है, तभी यज्ञद्वारा 'संस्कृत' होना प्रारंभ हो जाता है। यज्ञ के वातावरण मे जन्म लेता है। यज्ञ द्वारा पलितपोषित होता है। यज्ञ द्वारा ही अपना समग्र जीवन व्यतीत करता है। अन्त मे यज्ञ द्वारा ही अपनी इहलोक लीला (जीवन यात्रा, संसार) को समाप्त करता है।



**स्वामी विष्णुतीर्थ महाराज - देवास (म.प्र.)**

यज्ञ व सृष्टी उत्पत्ती, 'उरूज्योति' - संवादीक्रिया बहिर्गत व अंतर्गत यज्ञ (चित्र नं १)



**अंतर्गत यज्ञ - कुंडलिनी - उर्ध्व रेत क्रिया**

पृष्ठ क्र. १ - पॅट्रिझिया बेचले - (अरविंद शिष्या), - योगी श्री. विष्णु केशव पालेकर (१८८७ - १९६७), 'अप्रबुद्ध'

'The science of Yoga' - "science pure and science applied are both necessary for the purpose of real progress

३२ अध्यात्म विद्या - ह्या सर्व अलौकिक प्रयत्नांचा अनादर करणे व त्याबद्दल अनभिज्ञ रहाणे हा तर स्वत:च्याच भारतीय संस्कृतीचा अपमान करणे होय!!

**पुढचा दिशा अंक :**

या पुढील २००८ व २००९ या लेखांतील व पूर्ण आढावा पुढील दिशाच्या अंकात घेऊं या.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

**मुखपृष्ठावरून**
**संपादकीय**
**स्वाइन फ्लू आणि सामाजिकतेचे भान**

अशा कृत्यांवर नागरी संस्था आणि पोलिसांनी नियंत्रण आणावे ही समाजाची अपेक्षा असते. पण आज मितीस या सर्व संस्था, पोलिस यंत्रणा इतक्या भ्रष्ट, लाचार व बधिर झालेल्या आहेत, की अशा मंडळींना वेसण घालण्याऐवजी त्या त्याकडे डोळेझाक करतात.

ठाणे शहराच्या इतिहासात सर्व नागरिकांना शरमेने मान खाली घालावी लागेल अशी घटना या संदर्भात अलीकडेच घडली. ठाणे महानगर पालिकेच्या सध्याच्या आयुक्तांनी जी अकार्यक्षमता शहराच्या विद्रुपीकरणासंदर्भात दाखवली त्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने कडक शब्दांत ताशेरे ओढले व त्यांना पाच हजार रुपयांचा दंड केला. आत्मसन्मानाची भावना जागृत असणाऱ्या कोणाही व्यक्तीने अशा प्रसंगी आपल्या पदाचा राजीनामा देऊन दूर राहणे पसंत केले असते. पण आमच्या या बधिर नोकरशहांना कसलेही सोयरसुतक नाही.

ठाणे शहरावर आज जी अवकळा पसरलेली दिसते ती या अशा निष्क्रिय, भ्रष्ट आणि बधिर नोकरशहांमुळेच. यांच्या अकार्यक्षमतेमुळेच दही हंडी, गणपती, नवरात्र आणि पुन्हा एकदा जोरात साजरा होणारा माघी गणेशोत्सव रस्ते अडवून, नागरिकांना वेढीला धरून 'साजरे' होतील. स्वाइन फ्लूचे राजकारण करत शाळा, व्यवसाय बंद पाडू पाहणारी ही मंडळी आपल्या शिमग्या सदृश सण संस्कृतीवर नियंत्रण घालायला तयार नाहीत. गर्दी जमा करणाऱ्या या सणांमधून 'मला पहा आणि फुले वहा' असे व्यक्तिस्तोम माजवणारे राजकारण यांना करायचे असते. स्वाइन फ्लूचे निमित्त करून त्यांनी हेच चालू ठेवावे हे दुर्दैव आहे. ठाणे शहरातील नागरिकांनी निदान अशा सणांसाठी स्वेच्छेने वर्गणी देऊ नये. इतकेच नाही तर, सत्तेच्या अभिलाषेने गैर कृत्ये करणाऱ्या या राजकारण प्रेरित कार्यक्रमांत सहभागी होऊ नये.

स्वाइन फ्लू या रोगाच्या साथीपासून, या विषयावरील चर्चांमधून सामाजिकतेच्या संदर्भात आपण काही धडे घेतले तरच आपल्या सामूहिक, समाज म्हणून अस्तित्व असण्याला काही भविष्य उरेल. नाहीतर सण समारंभ म्हणजे या समाजाचे विकृत दर्शन ठरेल. ती आपली ओळख ठरेल. आपल्यातील निर्णय क्षमता व सदूसद्‌विवेक बुद्धीला असणारे हे आव्हान आहे!

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

# वाढदिवसाचे वाढते प्रस्थ !

*वाढदिवस कसा साजरा करावा याबद्दल विचार करायला लावणारा हा लेख. - संपादक*

हल्ली दूरदर्शनसारख्या दृक्‌श्राव्य माध्यमांमुळे चित्रपटसंस्कृतीचा घरोघरी, एवढेच नाही तर झोपडपट्टीतसुद्धा एवढा परिणाम झाला आहे की वाढदिवस म्हटला म्हटजे केक कापणे व मेणबत्ती विझवणे हा विधी झालाच पाहिजे. मग लहान बाळापासून म्हाताऱ्या माणसापर्यंत कोणाचाही वाढदिवस असू दे! स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली, आपण इंग्रजांना पळवले परंतु जाताना ते काही गोष्टी मागे ठेवून गेले. त्यापैकी ही एक प्रथा!

पाश्चात्य देशात जीवनाची संकल्पनाच निराळी असते. आयुष्यातील जेवढी वर्षे संपली तेवढी बाद झाली अशी धारणा करून तेवढ्या संख्येच्या मेणबत्या विझवतात व सुरीने केकचे तुकडे करतात. त्यांचा दृष्टीने ते बरोबर आहे. कारण मानवदेहाच्या इंद्रियांद्वारे विषयपूर्ती करून सुखाचा जास्तीत जास्त उपभोग घेणे हेच उद्दिष्ट समोर ठेवल्याने त्या देहाने व्यतीत केलेली वर्षे म्हणजे वाया गेलेली वर्षेच ठरतात. तेवढी वर्षे बाद झाली असेच म्हणायला हवे.

परंतु आपल्या हिंदु धर्मात मात्र मानवी जीवनाचा प्रत्येक क्षण काहीतरी अनुभव प्राप्त करून देणारा मानला जातो. त्यामुळे गत आयुष्यातील शिदोरी भावी काळास प्रकाश देणारी ठरते. ही संकल्पना व्यक्त करण्यासाठी आपण वाढदिवसाला गोडधोड पदार्थ करतो व निरांजनाने औक्षण करतो.

उक्ष्‌ म्हणजे शिंपडणे या धातूवरून औक्षण शब्द बनला आहे. आपल्याकडे ज्याचे मंगलकार्य असेल, त्याच्या चहेऱ्याभोवती निरांजन ओवाळतात. हा एक आयुष्यवर्धक विधी आहे असे शास्त्र सांगते. कुंकू हे सर्व मांगल्याचे प्रतीक आहे. म्हणून कुंकवाचा टिळा लावतात. अभद्र कर्तृत्वाचे छिद्र कुठे पडायला नको म्हणून अखंड अक्षता कपाळी लावतात. त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाला सोन्याचा सुगंध लाभावा यासाठी सोन्याच्या अंगठीने ओवाळतात. लाखमोलाचे आशीर्वाद घेण्यासाठी थोरामोठ्यांपुढे नतमस्तक होण्याची आपली संस्कृती आहे. वाढदिवस हा कौटुंबिक आनंदाचा दिवस आहे. सर्व कुटुंबाने त्या व्यक्तीसाठी परमेश्वराकडे सुयश व समृद्धीची प्रार्थना करायची असते. इतके मर्यादित स्वरूप पूर्वी होते.

वरीलप्रमाणेच माझा स्वतःचा, माझ्या भावंडांचा, आई-वडीलांचा व मित्रमैत्रिणींचा वाढदिवस साजरे झाल्याचे मला निश्चित आठवते.

पण आजकाल वाढदिवसाला उत्सवाचे स्वरूप आले आहे. काही लोक निमंत्रण पत्रिका छापतात, हॉल घेऊन सजवतात, कॅटरर्सला पाचारण करतात. मुले एकटी कशी येणार? म्हणून सोबत आई-वडील बोलावले जातात. आता २-३ माणसे जेवणार म्हटल्यावर प्रेझेंट पण त्यामानानेच द्यायला हवे नाही का? त्या खिशाला परवडत नसले तरी लोक काय म्हणतील? म्हणून मोठ्ठे आकर्षक पॅकींगमध्ये गिफ्ट आणायचे. मग ज्यांचा वाढदिवस ते आभारपत्रक व रिटर्न गिफ्ट देणार. नकळत देवाण घेवाण या गोष्टीला महत्त्व येते. त्यामध्ये वेळेचा व पैशाचा किती अपव्यय होतो हा विचारच नसतो.

(पान ३४ वर)

# श्रवणीय काही - १

*आकाशवाणीच्या अस्मितावाहिनीवरून प्रकाशित होणाऱ्या ‘ऐसी अक्षरे रसिक’ या कार्यक्रमातून प्रसारित झालेली ही व्याख्याने आहेत. श्रावण महिन्या निमित्ताने ती दिशासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल दिशाचे हितचिंतक डॉ. प्रदीप कर्णिक यांचे विशेष आभार. चिंतन मनन करण्यास प्रवृत्त ठरतील अशी ही व्याख्याने आकाशवाणीच्या सौजन्याने येथे प्रकाशति करत आहोत. - संपादक*

श्रावणमास म्हणजे अश्रद्धाला श्रद्धावान करणारा, भौतिकालाही आधिभौतिक बनवणारा, निरिश्वरवाद्यालाही ईश्वरी जाणीव निर्सगतः करून देणारा ठरतो. महनीय अशा तपस्व्यांनी अनुष्ठाने करून या श्रावणमासाला महान तर बनवलेच आहेच. परंतु सामान्यजनांनाही श्रवणभक्तीचा लळा लावणारा असा भारतीय संस्कृतीतील थोर आणि पावन असा महिना आहे.

‘श्रवणीय’ असे ऐकण्यासाठी, ऐकवण्यासाठी, ऐकून चिंतन - मनन करण्यासाठी हा वाचिक सुसंवाद.

प.पू. श्री. श्री. द. (मामा ) देशपांडे यांची यर्थाथ ओळख करून द्यायची तर असे म्हणता येईल की, “सद्गुरु संत ज्ञानेश्वर माऊलीचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष आचरणात आणणाऱ्या, प. पू. सद्गुरू योगिराज श्री. गुळवणी महाराजांनी स्वत:च्या हयातीत वेदप्रणीत शाक्तिपातविद्येचे शास्त्रोक्त आणि परिपूर्ण अधिकार दिलेले एकमेव अधिकारी, भगवत्‌ प्रेमात मुरलेले महान संत व लाखो शिष्यांच्या जिव्हाळ्याचे आदर्श प्रेमळ सद्गुरु” होते.

सत्त्वशील, परमार्थदृष्टच्या थोर अधिकारी व दत्तोपासक अशा प.पू. श्री. दत्तोपंत व प. पू. मातोश्री पार्वतीदेवी या दांपत्याच्या पोटी, भगवान श्री दत्तात्रेय, राजाधिराज श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज व प.पू. श्री. वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने आषाढ शुद्ध द्वितीया, श्री शके १८३६, दिनांक २५ जून १९१४ रोजी झाला.

माता-पित्यांच्या अलौकिक आध्यात्मिक व सत्त्वशील संस्कारांमुळेच प.पू.श्री. मामांनी आपल्या



**श्रीसंत मामासाहेब देशपांडे**

आयुष्यात प्रचंड आध्यात्मिक व सामाजिक सेवाकार्य उभे केले. तरुणपणी त्यांनी स्वातंत्र्य लढ्यासाठी थोर क्रांतिकारक म्हणून योगदान दिले. असहकार, सविनय कायदेभंग व स्वदेशी सत्याग्रह अशा विविध चळवळीत त्यांनी अनेकवेळा लाठीमार सोसला. सविनय कायदेभंगाच्या चळवळीचे नेतृत्व करताना, चपळाईने गोळ्या चुकवून ते बचावले. त्यावेळी 'बगाराम देशपांडे' या नावाने वर्तमानपत्रांतून त्यांचा बोलबालाही झाला होता. थोर स्वातंत्र्य सेनानी मा. यशवंतरावजी चव्हाण हे त्यांचे स्वातंत्र्यचळवळीतले सहकारी होते व दोघांनी एकत्र तुरुंगवासही भोगला होता.

प.पू. मामांच्या मातोश्री पार्वतीदेवी यांनी श्री. मामांच्या वडिलांच्या निधनानंतर एकाकी लढत देऊन मामांना आणि त्यांच्या इतर भावंडांना लहानाचे मोठे केले. मायेचे आणि परमार्थाचे खोलवर संस्कार करून मामांना जगाच्या कल्याणार्थ पात्र करून उभे केले.

आपल्या वयाच्या अवघ्या पस्तिसाव्या वर्षीच, आपल्या पत्नीच्या निधनानंतर आपल्या छोट्या लहानशा मुलाला पत्नीच्या भावजयीच्या ओटीत घालून, राजाधिराज सद्गुरु समर्थ अक्कलकोट स्वामी महाराजांच्या आज्ञेनुसार, मामा घराबाहेर पडले. त्यांच्या आध्यात्मिक कार्यास १९४८ रोजी प्रारंभ झाला.

१९ जून १९४८ रोजी श्री. मामा प्रथम पंढरपूरला गेले. त्यानंतर द्वारकेस गेले. राजकोट येथील कैवल्यधाम योगाश्रमात राहून त्यांनी स्वामी दिगंबरजी महाराजांकडून हठयोगाचे शिक्षण घेतले. पुढे गिरनार यात्रा, हिमालय यात्रा त्यांनी केल्या. या यात्रेत मामांना भगवंतांची दिव्य दर्शने झाली.

लहानपणापासूनच दासबोध, ज्ञानेश्वरी या सद्ग्रंथांचे वाचन, मनन आणि चिंतन करण्यात त्यांचा वेळ जात असे. ज्ञानेश्वरीतील ओव्यांची दिव्य अनुभूती गूढ अर्थासह त्यांच्या हृदयात प्रकट झाली, ती विष्णुप्रयाग येथे स्नानासाठी गंगेत बुडी मारल्यावर श्री भगवंतांचे दर्शन होताच.

प.पू. श्री. मामांच्या ठिकाणी प.पू.श्री. गुळवणी महाराजांकडून आलेली श्रीदत्तपरंपरा व शाक्तिपात परंपरा, सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजांकडून मिळालेली श्री नाथपरंपरा व प.पू. मातोश्री पार्वती देवींकडून प्राप्त झालेली श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांची समर्थ परंपरा असा अद्भुत व अपूर्व असा त्रिवेणी संगम झाला होता.

प.पू. मामांच्या अफाट कार्याची ही तोंड ओळखच आहे. त्यांच्या अलौकिक कार्याची ओळख आणखी भव्य-दिव्य आहे. ती नंतर पाहू आणि आजची सेवा त्यांच्या चरणी नम्रपणे अर्पण करू.

प.पू. श्री. मामांच्या आध्यात्मिक पौर्णिमेचा प्रारंभ १९५३ साली झाला. राजकोटला कैवल्यधाम योगाश्रमात, रामनवमीनिमित्त त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रथम प्रवचन केले. तेव्हापासून २१ मार्च १९९० रोजी यौगिक पद्धतीने समाधिस्थितीत पूर्वसूचना देऊन देह ठेवेपर्यंत श्री ज्ञानेश्वरीची प्रवचन सेवा निष्कामतेने व अत्यंत आवडीने केली.

१९३६ ते १९४८ अशी बारा वर्षे पंढरपूरची आषाढीची वारी नि:संगपणे त्यांनी केली व त्यानंतर १९४८ ते १९६० पर्यंत पंढरीची वारी ह.भ.प.श्री. केशवरावजी देशमुख महाराजांच्या दिंडी समवेत केली व १९६१ पासून आयुष्याच्या अखेरपर्यंत, त्यांनी स्वतंत्ररीत्या पंढरीची वारी स्वीकारलेली होती.

प.पू. मामांना १९५४ नंतर प.पू.श्री. गुळवणी महाराजांनी श्रीदत्त संप्रदायाचा दिव्य-अनुग्रह दिला आणि स्वत:हून परंपरेच्या आज्ञेने शक्तिपातविद्येची दिक्षा देण्याचे शास्त्रोक्त परिपूर्ण अधिकारही दिले. पुढे मामांनी त्यांच्या लाखो भक्तांना त्यांच्या त्यांच्या अधिकारांनुसार दिक्षा देऊन पावन केले, तरीही ते स्वत: आपल्या सद्गुरू भक्तिसेवेत कधीच कमी पडले नाहीत.

या सेवेतूनच आणि एकनिष्ठ भक्तिप्रेरणेतून मामांनी 'वामन स्तवनमंजिरी' आणि 'वामनत्रिपदी' या प.पू. श्री. गुळवणी महाराजांच्या चरित्र काव्यग्रंथांचे संपादन व प्रकाशन स्वखर्चाने केले. ह.भ.प.श्री. केशवराव देशमुख महाराजांची माडी विकत घेऊन 'श्रीज्ञानेश्वरी निवासाची' आणि 'ज्ञानेश्वर वाङ्मय अभ्यास मंडळा' ची स्थापना करून, तेथे श्री ज्ञानेश्वरीची प्रवचने आणि कीर्तन सेवा सुरू केली. ह.भ.प.श्री. केशवराव महाराजांनी केलेले 'ज्ञानेश्वरीचे सुलभ गद्य रूपांतर' संपादित करून, ते तीन खंडात प्रकाशित केले. त्याचेच कानडी भाषांतरही त्यांनी प्रकाशित केले. 'संतकृपा प्रतिष्ठान' ची स्थापना करून 'संतकृपा' मासिक सुरू करण्यात त्यांनीच प्रेरणा व आर्थिक बळ दिले. 'पंथराज' त्रैमासिक पुन्हा सुरू केले.

स्वत:जवळ कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना, त्यांनी अशक्यप्राय आव्हाने स्वीकारली. अनेक महान प्रकल्प उभारले व अनेक भावी प्रकल्पांचा पाया दूरदृष्टीने रचला. त्यासाठी त्यांनी 'श्रीपाद सेवा मंडळ' या संस्थेची रीतसर स्थापना केली. प.पू.श्री. गुळवणी महाराजांची आठवण म्हणून १९८३ साली 'श्री वामनराज त्रैमासिक' आणि 'श्रीवामनराज प्रकाशन' स्वत: सुरू केले. २००७ साली हे त्रैमासिक व प्रकाशन यांनी रौप्य वर्षात पदार्पण केले.

त्यांच्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक प्रकल्प म्हणजे, श्री क्षेत्र आळंदी येथील 'श्रीज्ञानदेव सिद्धबेट तपोवन; ज्ञान - योग - अध्यात्म विद्यापीठ प्रतिष्ठान' प्रकल्प होय. माऊलींच्या भावंडांसहित त्यांच्या आईवडिलांचे भव्य असे स्मारक उभे करून, सिद्धबेटास पूर्वीच्या तपोभूमीचे वैभव प्राप्त करवून देऊ इच्छिणारा हा प्रकल्प सध्या आकार घेतो आहे. साधकांनी आत्मसाक्षात्कारासाठी 'श्रीसंत मुक्ताई विद्यापीठा'त ज्ञान-बोध साधना साधावी व 'सिद्धबेट तपोवन सेवा'त प्रत्यक्ष अनुभूतीसाठी ध्यान-योग साधना करावी; अशी मामांची आदर्श संकल्पना होती. श्रीक्षेत्र माणगांव, श्रीक्षेत्र जळगाव - जामोद व श्रीक्षेत्र गाणगापूर येथील प्रकल्पांचाही त्यांनी संकल्प केला होता.

१९८३ साली स्थापन झालेल्या 'श्रीवामनराज प्रकाशना'ची सुरुवात 'श्रीवामनराज' त्रैमासिकाने झाली. शक्तिपातयोग व गुरुभक्ती या विषयांना वाहिलेले हे त्रैमासिक आहे. श्रीसंत ज्ञानेश्वर माऊलींच्या तत्त्वज्ञान आणि साहित्यपरंपरेला वाहिलेल्या 'बापरसुमादेविवरू' या मासिकाची मुहूर्तमेढही मामांनी रोवली.

संत साहित्य हा मामांचा नित्य चिंतनाचा विषय होता. त्यातही 'श्रीज्ञानेश्वरी' ही तर त्यांचे हृद्गतच होती. मामा प्रतिभा संपन्न साहित्यिक तर होतेच; परंतु परमोच्च गूढ पारमार्थिक अनुभूती प्राप्त झालेले महान संत होते. अभ्यासयोगावरील प्रवचनात्मक वितरणे, माऊलींचा हरिपाठ, इतर अभंगांवरील विवरणे, अशा विपुल साहित्याची निर्मिती मामांच्या पावन मुखातून बाहेर पडली. हा आध्यात्मिक ठेवा, मासिक, त्रैमासिक व ग्रंथरूपाने 'श्रीवामनराज' प्रकाशनाद्वारे उपलब्ध झाला आहे.

प.पू. मामांचे उत्तराधिकारी प.पू.श्री. शिरीषदादा व प.पू. सौ. शकाताई यांनी मामांची देदीप्यमान परंपरा व वारसा पुढे चालू ठेवला आहे. श्री. दादा व सौ. ताईंनीही या ग्रंथसंपदेतून ज्ञानपरंपरेतून, व गूढार्थाच्या विवरणातून मोलाचे मार्गदर्शन केले आहे. परंपरेच्या या महनीय ग्रंथांची ओळख आपण करून घेऊ या. ही आजची सेवा गुरुचरणी समर्पित.

आज गुरुवार. गुरू स्मरणाचा दिवस. माऊलींनी तेराव्या अध्यायात नमनाच्याच ओळीत असे म्हटलं आहे की,

जयांचे केलिया स्मरण। होय सकळ विद्यांचे अधिकरण।<br>
तेचि वंदू श्रीचरण। श्रीगुरूंचे॥

प.पू. मामा, प.पू. दादा आणि प.पू. ताई यांच्या

श्रीचरणी वंदन करून आज श्रीगुरूंच्या स्मरणांचीच ओळख करून घेऊ या.

प.पू. सद्‌गुरू योगिराज श्री. वा. द. गुळवणी महाराजांच्या श्रीशके १९१४ च्या पुण्यतिथी महोत्सवात प.पू.श्री. शिरिषदादांनी 'जयांचे केलिया स्मरण' या माउलींच्या एकाच ओळीवर तीन प्रवचनांच्याद्वारा निरूपण केले होते, ते या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहे. माऊलींनी श्रीगुरूंचे स्मरण तेराव्या अध्यायाच्या सुरुवातीला केले आहे, कारण इथून खऱ्या अर्थाने 'ज्ञानकांडाला' सुरुवात होते. सद्‌गुरुंचे स्मरण हे आदरयुक्त व्हायला हवे आणि याच खऱ्या स्मरणामध्ये भक्तियोग आहे. स्मरणभक्ती ही सर्वश्रेष्ठ भक्ती कशी आहे हे प.पू. दादांनी अत्यंत रसाळ आणि सोप्या भाषेत या पुस्तकाद्वारे मांडले आहे. असंच एक पुस्तक आहे प.पू. ताईचे 'करूनि सद्‌गुरूस्मरण अनुभविजे', तेही वाचायला हवं.

श्री. एकनाथ महाराजांचा 'ॐकार स्वरूपा सद्‌गुरूसमर्था' हा अभंग अतिशय प्रसिद्ध व लोकप्रिय आहे. श्रीक्षेत्र दत्तधाम येथे श्री शके १९२३ च्या श्री दत्तात्रेय जयंती महोत्सवात प.पू. ताईंनी या अभंगावर प्रवचन दिले होते. ते प्रवचन या पुस्तकात आहे. मुळात २९ चरणांचा असा हा प्रदीर्घ अभंग आहे. या पुस्तकात तो पूर्ण स्वरूपात दिला आहे. प.पू. ताईंनी त्यातील लोकप्रिय चरणांचे विवेचन केले आहे. संतांचे देणे अवीट आणि अफाट असते. सर्वांगाने आनंद उधळीत जाणारा हा अभंग नित्य चिंतनाचा विषय कसा आहे, हे प.पू. ताईंनी अत्यंत रसाळ शैलीत सांगितले आहे.

श्री एकनाथ महाराजांनी जसा अनाथांच्या नाथाला नमस्कार केला आहे, तसाच श्री नामदेव महाराजांनी सद्‌गुरूंना सोयरा जिवलग मानले आहे. या श्रीनामदेव महाराजांच्या 'सोइरा जींवलगा'ची उकल प.पू. श्री शिरीषदादांनी भिलाई केंद्रात चार प्रवचनात केली होती, ती 'सद्‌गुरुंसारिखा सोइरा जीवलग' या पुस्तकात समाविष्ट झाली आहे. सद्‌गुरू माहात्म्य सांगणाऱ्या श्रीनामदेवांच्या काही मोजक्या अभंगात, भाबडे भगवद् प्रेम आणि हृदयापासून उमटलेले स्वानभूतीचे सच्चे, निर्मळ बोल उमटलेले आहेत. हा अभंग तसाच आहे. याला करुणेचीही एक सहज किनार आहे. या सर्वांचा उलगडा श्री. दादांनी या प्रवचनात केला आहे.

प.पू. दाद, ताई यांच्या सह अनेकांचे सद्‌गुरु असणारे प.पू. श्री मामा यांचे स्मरण नित्यच होणार यात नवल ते काय! प.पू. श्री. मामांनी २१ मार्च १९९० रोजी देह ठेवला. त्यानंतर असंख्य चाहत्यांना पोरकेपण आले. मामांच्या स्मृती व आठवणींचा पूर दाटूनच येतो आहे. प.पू. दादांना महन्मंगल सहवास लाभला. या सहवास स्मृतींच्याद्वारे 'श्री सद्‌गुरूस्मरणी' या पुस्तकात प. पू. श्री. दादांनी स्मृतींची अनेक माणिक रत्ने एकत्रित केली आहेत. इतर साधकांच्या आठवणी 'कैवल्यलेणे' व 'पैल मेरूच्या शिखरी' या दोन ग्रंथात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अर्थात हे दोन ग्रंथ मामांच्या अमृतमहोत्सवा निमित्त प्रकाशित करण्यात आले होते.

प.पू. मामांची चरित्रेही लिहिली गेली आहेत. विठूदास म्हणजेच विठ्ठल माधव पागे यांनी 'श्रीपादचरितामृत' हे मामांचे ओवीबद्ध चरित्र लिहिले, तर प.पू. दादांनी 'श्री गुरू साहस्त्री' हे आणखी एक ओवीबद्ध चरित्र लिहून मामांच्या स्मरणाला चिरंतन मूल्य प्राप्त करून दिले. एका त्रयस्थाच्या भूमिकेतून, प.पू.श्री. मामा कसे घडले, याचे यथार्थ गद्य रूप 'देवाचिये द्वारी' या चरित्र ग्रंथात श्रीधर दत्तात्रेय आगाशे यांनी प्रत्ययाला आणून दिले आहे. 'श्रीपाद रूपसुधा' ही दोन खंडांची निर्मिती वेगळीच आहे. मामांची विविध भावचित्रे यात छायाचित्रांच्याद्वारे एकत्रित करण्यात आली आहेत. 'श्री गुरूदर्शन' हे माई साठेंनी लहान मुलांसाठी तयार केलेले मामांचे एक चरित्र ही आहे. संस्कारक्षम वयातील मुलांसाठी हे अत्यंत उपयुक्त आहे.

सद्‌गुरूंचे स्मरण ही जशी महत्त्वाची बाब साधण्यासाठी असते. तशीच 'सद्‌गुरूंची मानसपूजा'ही महत्त्वाची ठरते. ही मानसपूजा कशी करावी, याचे सविस्तर विवेचन, प.पू. दादांनी छोट्याशा पुस्तकात केले आहे. गुरू स्मरण ते मानसपूजेपर्यंतची माहिती देणारी ही पुस्तके सर्वांनाच उपयुक्त आहेत आणि विवेचनात गुंतवून ठेवणारी आहेत.

श्रावण कृष्ण द्वितीय आणि तृतीया. आज श्रावणी शुक्रवार. माता जगदंबा देवींच्या चरणी वंदन करून, आज श्री वामनराज प्रकाशनाने देवी महात्म वर्णिलेले आहे, अशा विविध पुस्तकांचा आपण परिचय करून घेऊ या.

'श्री दुर्गासप्तशती' हा अत्यंत प्राचीन असा ग्रंथराज आहे हे सर्वश्रुत आहे. संपूर्ण ग्रंथच मंत्रमय असा आहे. मूळ मोठ्या ग्रंथाचे संक्षिप्तीकरण प.पू.श्री. दादांनी केले आहे. मूळ ग्रंथात सातशे मंत्र आहेत; परंतु यात देवी माहात्म्याचे सात श्लोक घेऊन, याबरोबरच कवच, अर्गळा, कीलक, रात्रिसूक्त, देवीसूक्त इत्यादी सप्तशती पाठाची विविध अंगे घेतलेली आहेत. मूळ संस्कृत रूप देऊन त्याचे अर्थही सोबत दिलेले असल्याने, मंत्ररूप पाठ वाचताना अर्थामुळे रुचीही निर्माण होऊ शकेल असे 'सार्थ संक्षिप्त श्री देवीपाठ' पुस्तक आहे. याच पुस्तकाचे श्री. वि. गो. देसाई यांनी कन्नड भाषेतही भाषांतर केले आहे व संस्थेने तेही प्रकाशित केले आहे.

श्री एकनाथ महाराजांचा जोगवा प्रसिद्ध आहे. 'आईचा जोगवा, जोगवा मागेन' हा जोगवा 'अनादि निर्गुण प्रकटली भवानी' या नावाने असून, अनेकांचा तो तोंड पाठही आहे आणि नवरात्रीमध्ये आरतीमध्ये म्हणण्याची प्रथाही आहेच. प.पू. मामांनी या जोगव्याचे केलेले निरूपण आणि उलगडून दाखवलेला गूढार्थ नितांत सुंदर आहे. या जोगव्यातून श्री एकनाथ महाराजांनी आदिशक्ती कुंडलिनीचे अनुभवसंपन्न काव्यचित्र रेखाटले आहे. वरवर साधे, सोपे वाटणारे शब्द, आशयघन असतात; आणि गूढार्थाचे लेणे लेवून विस्मयचकित करतात, याचा प्रत्यय प.पू.श्री. मामांनी या निरुपणाद्वारे विशद केला आहे. अनादि जगदंबेची अनादि शोधयात्रा श्री. मामांच्या ओघवत्या अर्थमधुर, मार्मिक शब्दरचने मुळे मौलिक अर्थ उलगडून दाखवणारी झाली आहे. या पुस्तकाचेही कन्नड भाषेत भाषांतर झाले आहे.

प.पू.श्री. वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज यांनी अनेक उत्तमोत्तम ग्रंथांची निर्मिती मुख्यत: संस्कृत भाषेत केली आहे. व्याकरण, न्याय, वेदान्त, मीमांसा, साहित्य, योग, सांख्य इत्यादिंनी परिपूर्ण प्रमाणबद्ध आणि अत्यंत तेजस्वी, ओजस्वी असे श्री महाराजांचे साहित्य आहे. त्यांच्या विशाल व विपुल अशा वाङ्मयसागरातून प्रथम नऊ स्त्रोत्रे निवडून ती 'शक्तिस्तोत्रे' या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहेत. ती मूळ संस्कृतात देऊन त्यांचे विवरण, अन्वय व मराठी अर्थ श्री. काशिनाथ दत्तात्रेय समुद्र यांनी केला आहे. यात सरस्वतीची तीन स्तोत्रे एक शक्तिस्तोत्र आणि श्री रेणुका, श्री तुळजापुर वासिनी, श्री देवी, श्री अन्नपूर्णा व श्री अनसूया यांची स्तोत्रे समाविष्ट करण्यात आली आहेत. या सर्व नऊही स्तोत्रांच्या प्रतिपाद्य विषय भगवती परांबिकाच आहे. ती आद्य शक्तीच सर्वकार्य स्वरूपाची जननी आहे. ब्रह्मादिकांनाही जिच्या स्वरूपाचा ठाव लागत नाही, तिचीच काही रूपे या स्तोत्रांतून वर्णिलेली, स्तवन विषय झालेली आहेत. जिच्याविषयी श्री महेबी भागवतात विस्ताराने सांगितलेले आहे, तीच भगवती श्रीस्वामी महाराजांनीही शिवस्वरूपात आणि मातृस्वरूपात पूजिलेली आहे. श्री. स्वामी महाराजांची संस्कृत स्तोत्रे या पुस्तकामुळे मराठी भाषिकांना अर्थासह उपलब्ध झाली आहेत.

असेच एक नितांत सुंदर पुस्तक म्हणजे 'आदिशक्तीचे कवतुक मोठे' हे म्हणावे लागेल. प.पू.श्री. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांनी 'पद देवीचे' या शीर्षकाने प्रस्तुत अभंग लिहिला आहे. या अभंगावर प.पू. दादांनी

तीन प्रवचने दिली होती, ती या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहेत. श्री जगदंबेचे उपासक असतात; ते भूत्ये, आराध्ये किंवा भोटो या नावांनी प्रसंगी भेटतात. ते श्री जगदंबेची स्तुतिपर गीते गातात, तिच्या लीलांची वर्णने करणारी गीते गातात. भक्तांकडून जे काही मिळेल ते घेतात व जाताना ते श्री जगदंबेच्या वतीने, भक्तांना पोटभर आशीर्वादही देऊन जातात. श्री स्वामी महाराज या अभंगात म्हणतात की, या आदिशक्तीने मला 'भूत्या' केले आहे. नम्रता व लीनता घेऊन श्री स्वामी महाराजांनी समस्तांना जो उपदेश केला आहे त्याचे मार्मिक व रसाळ विवेचन श्री दादांनी या निरुपणात केले आहे.

श्री वामनराज प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या सर्वच पुस्तकात नेहमी भेटणारा विषय असतो, तो म्हणजे देवी भगवती शक्तीचा. ही शक्ती काय कार्य करते ते आपण आता पाहू.

श्रावण मासात पोथीच्या पारायणाला सद्‌भक्तांच्या दृष्टीने अनन्य साधारण महत्त्व असते. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची 'ज्ञानदेवी', 'श्री गुरुचरित्र' इत्यादी अनेक ग्रंथांचे पारायण केले जाते. श्रीवामनराज प्रकाशनाने श्री ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीची कुंटे प्रत प्रसिद्ध केली आहे, या पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्रावण मासाचे पारायण करायचे असल्यास रोज किती अध्याय व किती ओव्या वाचायला हव्यात त्याचा तक्ताही दिला आहे, अर्थात हा तक्ता याच प्रतीला लागू पडतो. ही कुंटे प्रत संप्रदायामध्ये फारच लोकप्रिय आहे. मातोश्री पार्वतीदेवी, खुद्द प.पू. मामाही हीच प्रत वापरीत असत. याच प्रतीचे नित्यपठणही कसे करावे याचेही मार्गदर्शन यात केले आहे. रोज शंभर ओव्या वाचाव्यात. त्या वाचून झाल्यावर शंभर ओव्यांना जितका वेळ लागत होता, तितक्या वेळात फक्त दहा ओव्या वाचाव्यात आणि असे करून पूर्ण ग्रंथ वाचून झाला की, त्याचवेळेत फक्त एक ओवी वाचावी असे मार्गदर्शन प.पू. मातोश्री पार्वतीदेवींनी मामांना केले होते, ते सर्वांनाच उपयुक्त आहे.

'गुरुचरित्र' हा ग्रंथ फारच मोठा असा ग्रंथ आहे. नित्यपठणासाठी साररूपाने पाठ उपलब्ध व्हावा म्हणून खुद्द श्री. मामांनी या पोथीचे संक्षिप्त रूप तयार केले. यातून अनावश्यक विस्तार, द्विरुक्ते, धर्मशास्त्रीय चर्चा, कर्मकांडे वगळलेली आहेत. पारायण कसे करावे, नित्यपाठाची ओवी संख्या किती असावी, याचेही मार्गदर्शन यात केले आहे.

'श्रीदत्तलीलामृताब्धिसार' ही पोथी श्री. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांच्या एक सहस्त्र ओवीसंख्या असणाऱ्या मूळ प्राकृत ग्रंथाची सारां आवृत्ती आहे. मामांनीच याचेही संपादन केले आहे. 'श्री दत्त पुराण' या ग्रंथाचा सारांश साडेतीन हजार संस्कृत श्लोकांच्या ग्रंथाचा अनुवाद, खुद्द स्वामी महराजांनीच केला आहे. भक्तिरसाने रसरसलेला हा ग्रंथ भगवान दत्तात्रेयांच्या अनुग्रहलीलांचे प्राधान्याने वर्णन करणारा आहे.

'श्रीदत्तमाहात्म्य' हा मूळ ग्रंथ श्री. टेंबेस्वामी महाराजांचाच आहे. अत्यंत नेटका, भाषा-सौष्ठवपूर्ण, मार्मिक तत्त्वज्ञान युक्त आणि मंत्रवत फळ देणारा असा हा ग्रंथ आहे. महायोगाची अनेक गूढरहस्ये देखील या ग्रंथात ठिकठिकाणी प्रकट झालेली आहेत. श्री. मामांनी याची चिकित्सक व शुद्धपाठ आवृत्ती तयार केली आहे. या ग्रंथाला श्री. दादांची अभ्यासपूर्ण प्रस्तावनाही लाभली आहे.

'श्री सप्तशती गुरु चरित्र सार' हा ग्रंथ मूळ ७०७ ओव्यांचा असून श्री स्वामी महाराजांनी निर्माण केला आहे. मूळ गुरुचरित्र वाचणे ज्यांना शक्य होणार नाही, त्यांच्यासाठी हा साररूप लघुग्रंथ आहे. या ग्रंथाचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक ओवीतील पहिल्या चरणातील तिसरे अक्षर, क्रमाने वरून खाली असे वाचत गेल्यास, श्रीमदभगवद्‌गीतेतील पंधरावा अध्याय संपूर्ण तयार होतो. सदर आवृत्ती पारायणासाठी म्हणून सोयीची व्हावी म्हणून परिशिष्टे वगळून सुटसुटीत केली आहे.

भगवान श्रीदत्तात्रेयांची सार्थ सोळा अवतार चरित्रे,

सार्थ श्रीदत्तस्तोत्रे अशी अन्य पुस्तकेही उपलब्ध आहेतच. परंतु श्री. मामांनी रचिलेली 'श्रीदत्तभावांजली' अत्यंत प्रभावी आहे. ७७ ओव्यांची ही भावांजली पुण्याच्या माऊलीत दर गुरुवारी म्हटली जाते. या काव्यामध्ये काही तरी अद्भुत शक्ती आहे हे नक्की. या काव्याच्या एका ओवीचं जरी चिंतन करायला बसलो तरी, ताबडतोब मनाचा लय व्हायला लागतो असं स्वत: मामांनीच म्हणून ठेवलेलं आहे. या भावांजलीचं गूढ रहस्य अकरा प्रवचनांत प.पू. दादांची उलगडून दाखवलं आहे. ते पुस्तक प्रकशित झालं आहे. प.पू. दादांनी आणि विठ्ठदास पागे यांनी लिहिलेल्या प.पू. मामांच्या चरित्रात्मक ओवीबद्ध पोथ्याही पारायणाच्या दृष्टीने अत्यंत पवित्र आहेत.

साक्षात परिपूर्ण ब्रह्म, कलियुगातील सगुण-साकार भगवद्रूप, बोला-बुद्धीच्या पलीकडले, सद्‌गुरूंचे आदिपीठ असे. राजाधिराज सद्‌गुरू समर्थ श्री अक्कलकोट स्वामी महाराज यांच्यावरील २७ अभंगांचा 'श्री स्वामी समर्थ नामपाठ' प.पू. दादांच्या अमृतवाणीतून बाहेर पडला आहे. या नामपाठाचे वाचन रोज किंवा अनुष्ठान पद्धतीने करता येते व करता येण्यासाठी भाग्यही लागते.

अशी पारायणासाठी खास तयार केलेल्या पोथ्यांची ही माहिती. ही सेवा अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज सद्‌गुरू श्री अक्कलकोट स्वामी महाराजांच्या चरणी अर्पण करतो.

आजचा दिवस पवित्र दिवस. श्रावण कृष्ण सप्तमी. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माउलींची जयंती आणि श्रीभगवान श्रीकृष्णांची जयंती. श्री ज्ञानेश्वर माऊली श्री भगवान श्रीकृष्णांचे अवतार समजले जातात. श्री भगवान श्रीकृष्ण आणि श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणाला वंदन करून, त्यांच्या कृपाशीर्वादाची प्रार्थना करून आणखी काही पुस्तकांचा परिचय करून घेऊ या.

श्री ज्ञानेश्वरी हा महान ग्रंथ कसा वाचावा, याबद्दल अनेक विद्वानांनी मार्गदर्शन केल आहे. पण श्रीसंत जनाबाईनी केलेल मार्गदर्शन जे आहे, ते एका छोट्याशा, परंतु थोर अशा अभंगातून केल आहे. 'वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी।' असं श्रीजनाबाई सांगतात. ज्ञानेश्वरी वाचून कोणती पंढरी पहायची! याचा गूढ व आध्यात्मिक अर्थ नेमका काय, याचा उलगडा करणारे एक पुस्तक 'वाचावी ज्ञानेश्वरी' या नावाने प.पू. दादांनी लिहिले आहे. ज्ञानेश्वरीच्या वाचनाची दिशा जी श्रीसंत जनाबाईंनी विशद केली आहे, त्याची 'चावी' च प.पू. दादांनी आपल्या हाती सुपूर्द केली आहे.

एकेका अभंगाचे विस्ताराने गूढ-गहन अर्थ विशद करणारी स्वतंत्र पुस्तके श्री. दादा व ताईंनी लिहिली आहेत, ती अतिशय सुंदर व मोहक आहेत. 'पैल तो गे काऊ कोकताहे', 'रुणु झुणु रुणुझुणु रे भ्रमरा', 'सोनयाचा दिवस आजि अमृते पाहिला' अशा माऊलींच्या अभंगांवर सुरेख आणि सर्वस्वी वेगळा गूढार्थ विशद करणारी पुस्तके ताईंनी लिहिली आहेत. ज्ञानदेवांच्या हरिपाठातील काही अभंगांचे विवरण श्री मामांनी व दादांनीही केले आहे.

गोपाळ हरि देशमुख म्हणजे लोकहितवादीचे नातू ह.भ.प.वै. केशवराव महाराज देशमुख यांनी 'ज्ञानेश्वरीचे सुलभ गद्य रूपांतर' केले आहे. ते श्री मामांनी प्रकाशित केले. हे केशवराव महाराज तीस वर्षे पुण्यात देशमुख माडीवर रोज ज्ञानेश्वरीवर प्रवचन करीत असत. त्यांनी हे सुलभ गद्य रूपांतर करून ठेवले होते आणि नंतर त्यांनाच देवाज्ञा झाली. पुढे काही दिवसांनी ते आपल्या पत्नीच्या स्वप्नात आले आणि त्यांनी पुस्तकाचे हस्तलिखित बाड कुठे ठेवले आहे ते सांगितले व बाड श्रीमामांकडे प्रकाशनार्था द्यायला सांगितले होते, असे त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. याच केशवराव महाराजांनी श्रीचांगदेव पासष्टी, अमृतानुभव आणि हरिपाठ यांचे ही सुलभ गद्य रूपांतर केले आहे व ती पुस्तके श्री वामनराजने प्रकाशितही केली आहेत.

कल्याण पत्रिका, मुद्राक्रम, श्री ज्ञानदेव तेहत्तिशी अशी

निर्जीव पांडित्य हा शाप आहे.

काही लघुग्रंथांची निर्मिती श्रीज्ञानदेवांच्या नावावर सांगितली जाते. या विषयी अनेक वादही आहेत. या पुस्तकांची संहिता व त्याबाबतची भूमिका विशद करणारी 'लघुग्रंथत्रयी' व 'लघुग्रंथसप्तक' अशीही दोन पुस्तके अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

नाथसंप्रदायाची परंपरा ज्ञानेश्वरीत ठिकठिकाणी अधोरेखित झाली आहे. हे निगूढ योग सहज लक्षात येत नाहीत. श्रीचरणसंप्राप्तियोग, हिरण्य योग, दिव्यांजन योग, शब्दद्युतियोग आणि अजता योग असे योग पंचक विविध ओव्यांमधून निवडून काढून ते एकत्रित करून अन्वयासह दिले आहेत ते श्री. दादांनी. ज्ञानदेवीतील एकेका ओळीवरील दीर्घ चिंतनांची पुस्तके तर अनेकच आहेत व ती मूळातून वाचायला हवीत.

ज्याला केवळ अफाट संशोधन म्हणता येईल, असे एक पुस्तक म्हणजे 'मूलपाठ दीपिका श्री ज्ञानेदेवी' हे होय. याचा आतपर्यंत एकच खंड प्रकाशित झाला आहे. दुसरा यायचा आहे. ज्ञानेश्वरीची पाठशुद्ध आवृत्ती तयार करायचे प्रयत्न अनेकांनी केले पण अजून सर्वमान्य अशी संहिता होऊ शकली नाही. प्राचार्य रामदास डांगे यांनी शेकडो हस्तलिखिते जमा केली, त्यांचा शोध घेतला, अनेक अभ्यासक संशोधकांच्या भेटी घेतल्या, प्रदीर्घ चर्चा केली आणि मग स्वत:च्या चिंतनशीलतेतून पाठशुद्ध संहिता तयार केली. ती पाहून थक्क व्हायला होते. असाच एक संदर्भग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरीची ओवी सूची म्हणता येईल.

संपूर्ण ज्ञानेश्वरीतील पसायदान हा सर्व 'दानां' चा सुवर्ण कळस आहे. या पसायदानाचे ५५० पानांचे विवेचन वाचले की असेच थक्क व्हायला होते. हे विवेचन श्री. दादांनी केले आहे.

आज गोकुळाष्टमी, उद्या दहिकाला. कृष्णभक्तीने तर साऱ्या देशाला आकर्षित केले आहे. त्यावरती 'कृष्णांजन', 'म्हाँरा री गिरधर गोपाळ', 'कृष्णपर्व', 'कृष्णमूल', 'कृष्णा मजकडे पाहू नको रे', अशी किती तरी पुस्तकं आहेत. या सर्वात श्री दादांचा एक लेख 'काल्याचे रहस्य' म्हणून जो आहे, तो विशेष सुंदर असा आहे. काला या शब्दांमधील 'क' हे कामबीज आहे. 'आ' हे अनंतबीज आहे. 'ल' अमृतबीज आहे पुन्हा 'आ' अनंतबीज. या सर्वांचा मिळून 'काला'. मूळ लेखच त्यासाठी वाचायला हवा.

किती पुस्तकं सांगावीत! सारीच एकाहून एक थोर आहेत.

आज नारळी पौर्णिमा. रक्षाबंधन. उसळलेला दर्या श्रीफळाच्या दानाने शांत होते; तसाच मनदर्या शांत व्हायला श्रीसद्‌गुरू कृपेची पौर्णिमा आयुष्यात उगवावी लागते. त्यासाठी पूर्वसुकृताची जोडही घेऊन यावी लागते. पूर्व संचित फळाला येते तेव्हाच श्रीसद्‌गुरूंची भेट घडते. ज्यांना ज्यांना श्री. मामांची कृपा लाभली त्यांचे भाग्य काय वर्णावे! पण ज्यांना लाभली नाही त्यांच्यासाठी त्यांचे 'ज्ञान संचित' आहेच की! त्याचे चिंतन व सहवास लाभणे हाही एक अपूर्व असा योग आहे.

'ज्ञान ही विकण्याची वस्तू नाही' ही मामांची धारणा होती. ही धारणाच ब्रीद वाक्याप्रमाणे कार्यावर ठसून 'श्रीवामनराज प्रकाशन' संस्थेने निर्मितीमूल्यात साधकांना ग्रंथ उपलब्ध करून दिले आहेत. या पुस्तकांचा प्रसारही मौखिक परंपरेने साधकांच्याचद्वारे होतो आहे. ओळखीच्या, समविचारी, मुमुस् साधकांनी हे संचित इतर साधकांपर्यंत न्यायचे आहे. 'श्रवणीय काही' हा त्याचाच एक भाग!

पारमार्थिक प्रगती आणि आत्मज्ञानासाठी, 'योग व बोध' अशा दोन्ही अंगांची प्रगाढ आवश्यकता असते. सद्‌गुरूकृपेने दिक्षा झाल्यानंतर, नियमित साधना केल्याने योगाचे अंग आपोआप विकसित होत जाते; मात्र बोधाच्या अंगाने बहुतांश साधक मागेच राहिले जातात. याचे कारण शास्त्र ग्रंथ वा संतसाहित्याचा अभ्यास होत नाही, केला जात नाही. गुरूमुखातून बोध होणे ही अत्यंत भाग्याची

पातळी समजली जाते. ते सद्‌भाग्य आपल्यापाशी नसले तरीही गुरूमुखातून निर्माण झालेला 'ज्ञानबोध' ग्रंथरूपाने उपलब्ध असेल तर तो वाचणे सामान्यांना सहज शक्य असते. आणि म्हणूनच श्री. मामांनी १९८३ साली 'श्रीवामनराज प्रकाशन' संस्थेची मुहूर्तमेढ रोवली होती.

'श्रीवामनराज' त्रैमासिक, 'बापरखमादेविवरू' हे मासिक आणि सुमारे १६०-१७० पुस्तके या संस्थेद्वारे प्रकाशित झालेली आहेत. त्यामध्ये श्री ज्ञानेश्वरी व श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचे समग्र वाङ्मय, दासबोध, श्रीगुरुचरित्र, प.पू.श्री. मामांची चरित्रे, साधनाविषयक साहित्य, श्रीदत्तसंप्रदाय विषयक साहित्य, नाथसंप्रदायाचे दुर्मिळ ग्रंथ, अनेक संतांच्या गूढ अभंगांचे विवरण, साधनेतील शंका समाधान प.पू. श्रीमदाद्यशंकराचार्यांचे साहित्य इत्यादी अनेक विषय आले आहेत. याबरोबरच ज्ञानेश्वरी ओवीसूची, संशोधनात्मक वाङ्मय, संतसाहित्यावरील प्रबंध, काव्य आणि अभंग रचना अशीही ग्रंथ रचना प्रकाशित झाली आहे.

विविध योगशास्त्र, भक्तिशास्त्र, एकनाथी भागवत, प.पू.श्री. टेंबेस्वामी महाराजांचे समग्र वाङ्मय, भगवान गोरक्षनाथ महाराजांचे दुर्मिळ ग्रंथ, श्रीसंत गुलाबराव महाराजांचे साहित्य, अनेक संतांचे निवडक अभंग, जुने दुर्मिळ ग्रंथ व संत साहित्य, शक्तिपात योगावरील सर्वांगीण विचार, वेदान्त व षड्‌दर्शने, उपनिषदे, धर्मशास्त्र इत्यादी विषयांवरील साधकोपयोगी पुस्तके हळूहळू प्रकाशित केली जाणार आहेत.

प.पू.श्री. मामांनी 'श्रीपाद सेवा मंडळा'ची स्थापना केली तेव्हा जी उद्दिष्टे त्यांच्या समोर होती, त्यापैकी 'संत साहित्यातील विशुद्ध तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसारासाठी ग्रंथ प्रकाशने करणे; नियतकालिके चालविणे हे एक प्रमुख उद्दिष्ट होते. गेल्या २४-२५ वर्षात या पुस्तकांच्या व त्रैमासिक आणि मासिकांतील लेखांच्याद्वारा हे उद्दिष्ट तडीस गेले आहे असे दिसून येते.

या सर्व साहित्याचा अभ्यास, वाचन, मनन, आपण कशासाठी करायचा! त्याचे अगदी समर्पक उत्तर प.पू. दादांनी एके ठिकाणी देऊन ठेवले आहे. ''या सर्व साहित्याचा अभ्यास, वाचन, मनन आपण करू लागलात की, आपणास त्यातून सद्‌गुरूंचे परंपरासिद्ध मार्गदर्शन मिळून, अध्यात्माच्या मूलतत्त्वांची व तत्त्वज्ञानाची ओळख होईल. साधनाविषयक शंका दूर होतील व हळूहळू बोधाचे अंग पक्के होऊन अध्यात्मज्ञानाही दृढ होऊ लागेल. हा अभ्यास वाढू लागला की, 'श्रीपाद सेवा मंडळां'द्वारे वेळोवेळी आयोजित होणाऱ्या अध्यात्म-शिबिरांमधून होणारी प्रवचने व चर्चा यांचे नीट आकलनही घडू लागेल; व साधनेचे महत्त्व कळून साधनेची गोडी व प्रेम वाढेल.''

दीक्षाप्राप्त साधकांना बोधासाठी उपयुक्त असणारी ही ग्रंथसंपदा आहे तर, दीक्षा मिळावी अशी इच्छा असणाऱ्यांसाठी ही आवश्यक अशी तयारी करून घेणारी ज्ञानगंगा वाहते आहे. स्नानास उतरायचे की काठावर बसून राहायचे हा ज्याच्या त्याच्या भाग्याचा भाग आहे.

आज श्रावणातला शनिवार. शक्तिशाली श्रीमारुती-रायांच्या चरणी नम्र वंदन करून श्रीदेवी भगवती कुंडलिनी शक्तीच्या महान कार्याकडे वळू या.

प.पू.श्री. मामांनी फार पूर्वी 'भगवती कुंडलिनी' वर एक प्रवचन दिले होते. ते प्रवचन संकलित करून 'वामनराज' मासिकाच्या दुसऱ्या अंकात छापण्यात आले आहे. या लेखात मामा कुंडलिनीशक्ती म्हणजे काय, ते सांगताना 'हठयोग प्रदीपिका' या ग्रंथाचा दाखला देतात. त्यात आलेले वर्णनही विशद करतात. ज्याप्रमाणे वन, पर्वत, नदी, सरोवर व समुद्रासह पृथ्वी या सर्वाचा आधार शेष आहे, त्याचप्रमाणे सर्व योगांचा व तंत्राचा आधार कुंडलिनी शक्ती आहे.

ही कुंडलिनी शक्ती माणसाच्या शरीरात कुठे असते, याचेही विवेचन मामांनी सुरेख केले आहे. ही सूक्ष्म महाशक्ती

मूलाधार स्थानी निवास करून राहते. ती साडेतीन वेढे घालून तेथे बसली आहे.

याच कुंडलिनी शक्तीचे वर्णन संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांनी सुद्धा ज्ञानेश्वरीतील सहाव्या अध्यायात केले आहे.

ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्य चक्रवर्तीची शोभा।
जिया विश्ववीजाचिया कोंभा। साडली केली॥ ६.२७२॥

माउली ज्ञानदेव महाराजही भगवती कुंडलिनीला अत्यंत महत्त्व देतात. ती महामाया जगदंबा कुंडलिनी, चैतन्य चक्रवर्ती असा जो परमात्मा, त्याच्या शोभेचे कारण आहे. त्या परमात्म्याला या जगदंबेमुळेच शोभा आलेली आहे, असे माऊली सांगतात.

संपूर्ण ज्ञानेश्वरीतील सहावा अध्याय अतिशय कठीण व अवघड असा आहे. भल्याभल्यांना या अध्यायाने चकवा दिला आहे. अनुभवांच्या प्रातांत विहार करणाऱ्या संत-महात्म्यांनाच या अध्यायाच्या अचूकपणे अन्वयार्थ लागू शकतो. शब्दज्ञानाने समजून घेणाऱ्यांचा घोटाळा होऊ शकतो.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणूनच मामांच्या संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ झाला आहे. ज्ञानेश्वरीच्या संबंधाने इतके ग्रंथ वामनराजने प्रकाशित केले आहेत की थक्क व्हायला होते. नुसत्या सहाव्या अध्ययावरच अनेक पुस्तके आहेत. मामांनीच सहाव्या अध्ययाचे विवेचन करणारी पाच पुस्तके लिहिली आहेत.

'तो अध्याय सहावा', 'येईजे पश्चिमेचिया घरा', 'अभ्यासचि आपणयाते करी', 'हा अवधारी पंथराजु', 'बुद्धीची फुलिका विरे' अशा या पाच पुस्तकांतून माऊलींनी जो 'नाथसंकेतीचा दंश' उघड करून दाखविला आहे, तोच मामांनी अत्यंत रसाळ भाषेत स्वानुभवाच्या आधारे विशद केला आहे. ही प्रवचन माला पूर्वी 'संतकृपा' मासिकांतून प्रकाशित झाली होती.

प.पू. मामांप्रमाणेच प.पू. ताई आणि दादांनीही सहाव्या अध्ययावर स्वतंत्रपणे लिहिले आहे. 'करूनि सद्‌गुरू स्मरण, अनुभविजे' हे प.पू. ताईंचे पुस्तक आहे, तर 'जो संती वसरिला ठावो' हे प.पू. दादांचे पुस्तक आहे. दादांचे पुस्तक तर सहाव्या अध्यायातील अकराव्या श्लोकावरील भाष्य आहे. अत्यंत गूढ, गहन अशा या विषयाचे इतके सुंदर, सोपे व रसाळ विश्लेषण कुठेच सहजगत्या सापडत नाही. तांत्रिक बाबींची क्लिष्टता नाही, योगावरील काथ्याकूट नाही, शरीरांतर्गत असणाऱ्या चक्रांचा गोंधळ नाही, इतकी या पुस्तकांची शैली सोदाहरण झाली आहे.

ज्ञानदेवांच्या साहित्याचे विवेचन करणारी कितीतरी पुस्तके श्रीवामनराजतर्फे प्रकाशित झाली आहेत. 'विषयांचा विसरू पडे', 'अवीट गे माये विटेना', 'होआवे आसन ऐसे', 'अभ्यासाचि पाखर पडे' अशी कितीतरी उदाहरणे देता येणे शक्य आहे.

माउलींनी अभ्यास योगात कुंडलिनीचे जे वर्णन केले आहे ते अत्यंत बहारीचे आहे.

तंव येरीकडे धनुर्धरा। आसनाचा उबारा।
शक्ती करी उजगरा। कुंडलिनीये॥
नागाची पिले। कुंकुमे नहाले।
वळण घेऊनि आले। सेजे जैसे॥
तैशी ते कुंडलिनी। मोटकी औटवळणी।
अधोमुख सर्पिणी। निदेली असे॥

माणसाची कुंडलिनी शक्ती जागृत होण्याची क्रिया अत्यंत महत्त्वाची असते. ती कशी जागृत होते? तर सद्‌गुरूंची कृपा झाल्यावर. सद्‌गुरूंनी शक्तिपात दीक्षा दिल्यावर. पण सद्‌गुरू कसे प्राप्त होतात? त्यासाठी काय करावे लागते? काय असावे लागते? ते आपण उद्या पाहू

या.

पूर्व सुकृत असल्याशिवाय, पूर्व संचित गाठी असल्याशिवाय खऱ्या सद्गुरूंची प्राप्ती होत नाही, खरे म्हणजे, ज्यांना परंपरेने शक्तिपात दिक्षा देण्याचे अधिकार दिले आहेत असे सद्गुरू मिळायला भाग्य असावे लागते. यासाठी नामाचे महत्त्व माहीत असायला हवे. नामाचे महत्त्व सर्वच संतांनी मांडलेले आहे, पण भगवत नामाची गोडी लागायलाही काय करावे लागते त्याचे विवेचन प.पू. दादांनी फारच सुंदर केले आहे.

दादा म्हणतात, अगोदर मनाचा मोठा निर्धार लागतो. कारण सद्गरू भेटीच्या आधीसुद्धा, जो एक विशिष्ट अंत:करण मळ असतो, तो त्याच्या आड येत असतो. आपण जे पूर्व - संस्काराचे भांडवल आपल्याबरोबर जन्मत: आणलेले असते, ते पाप-पुण्याचे एक अजब मिश्रणच असते. हे पाप-पुण्याचे मिश्रण परमार्थाच्या काही उपयोगी नसते. परमार्थाच्या उपयोगाला जे पुण्य येते, त्याला 'शुद्ध-पुण्य' म्हणतात. असे भेसळरहित पुण्य मिळवण्याची साधने दोन. एक, श्रीभगवंतांची अथवा संत महात्म्यांची, श्रीसद्गुरूंची सेवा आणि दुसरे म्हणजे श्रीभगवंतांचे नामस्मरण.

नामस्मरण करता करता कर्मसाम्यदशा येते व त्यातून सद्गुरूंची भेट होते व सद्गुरुंना योग्य वाटले तर ते त्या जीवाला शक्तिपात दीक्षा देतात. अशी दीक्षा मिळाल्यावर साधकाने फक्त साधना करायची असते. ती भगवतीशक्तीच बाकी सर्व कार्य करते. एकेक वासना जाळत जाळत ती जीवाला घेऊन जाते.

ही जी शक्तिपात दिक्षा आहे, या संबंधाने श्रीवामनराज प्रकाशन संस्थेने उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित केली आहेत. 'कुंडलिनी जागृतीसाठी श्री गुरूकृपेची आवश्यकता' हे प.पू. मामांचे पुस्तक जसे आहे. तसेच आणखी 'श्री गुरुकृपेनंतरही अभ्यासाची आवश्यकता' असेही एक पुस्तक आहे. पहिल्या पुस्तकात श्रीगुरूकृपेची आवश्यकता विशद केली आहे. एकदा दीक्षा मिळाली, गुरूकृपेने कुंडलिनी जागृत झाली, म्हणजे सर्व संपले असे नाही. त्या कृपाप्रसादानंतरही साधनेचा अभ्यास करावा लागतो, तो कसा करावा, का करावा याचे मार्गदर्शन मामा दुसऱ्या पुस्तकात करतात.

साधना करताना साधकाला अनेक प्रकारचे अनुभव येतात, शंका येतात. त्यांचे निरसन व्हावे असे साधकाला वाटत असते. आपल्याला आलेले अनुभव कोणत्या प्रकारचे आहेत, याबद्दलही त्याला कुतुहल वाटत असते. अशा साधकांना मार्गदर्शन व्हावे यासाठी प.पू.ताईंनी 'साधना पाथेय' आणि 'साधना सर्वस्व' अशी दोन पुस्तके लिहिली आहेत. ती अत्यंत मोलाचे असे मार्गदर्शन करतात.

प.पू. दादांनीही साधनेसंबंधी मार्गदर्शनपर पुस्तके लिहिली आहेत. साधनापथावर दृढ करणारे नियम व काही साधनासूत्रे 'साधना पथप्रदर्शिका' या पुस्तकात दादांनी दिली आहेत. तसेच 'साधक अधिकार बोधिनी' या पुस्तकाद्वारे साधकाला परमार्थाच्या प्रांगणात तो नेमका कुठे आहे हे कळून येऊ शकते. यासाठी दादांनी दहा प्रश्नांचे दहा संच दिले आहेत. या सर्व प्रश्नांची साधकाने एकांतात प्रामाणिकपणे उत्तरे दिल्यास व त्याला मिळणाऱ्या गुणांची बेरीज केल्यास, त्याचा त्यालाच स्वत:च्या प्रगतीचा बोध होऊ शकतो.

या शक्तिपात दिक्षेच्या संदर्भात प.पू. दादांनी लिहिलेली दोन पुस्तके विलक्षण महत्त्वपूर्ण आहेत. एकूणच दिक्षेसंबंधाचे सर्वत्र जो धुडगूस चालू आहे, त्यावर वैचारिक अंजन घालणारी ही पुस्तके आहेत. पैकी एक आहे 'दिक्षा रहस्य'. हे पुस्तक 'बाजारू गुरूं'ना चांगलेच उघडे करणारे पुस्तक आहे. संप्रदायाच्या परम रहस्यांपैकी काही विशिष्ट भाग यात उलगडून दाखवला आहे. या पुस्तिकेतही शेवटी ज्यांना गुरू व्हावे असे वाटते, त्यांच्यासाठी एक प्रश्नावली देण्यात आली आहे. दुसरे पुस्तक आहे 'शक्तिपात योग संप्रदाय: ऱ्हासाची कारणमीमांसा' या संप्रदायात ज्या विकृत

रूढी निर्माण झाल्या आहेत, त्याचे पुढे शास्त्र बनू नये म्हणून, कोणाचाही अधिसेवन होता, दादांनी परमार्थिक फसगतीची मीमांसा, शक्तिपात विद्येचे पूर्वस्वरूप, आजचे स्वरूप, होणारे प्रमाद इत्यादींचे अत्यंत मनोज्ञ वर्णन केले आहे. सारासार विवेक ठेवला तर हे पुस्तक साधकांना अत्यंत मार्गदर्शक ठरू शकते, व फसगतही टळू शकते.

दिक्षेच्या संदर्भात झालेले हे कार्य एकमेव असेल. अर्थात दिक्षा मिळाली, साधना जरी रोज केली, तरी नित्यउपासना करायचीच असते व ती केलीही जाते. नित्यपाठाच्या पोथ्या, पारायणे, यांना तर श्रावण मासात अधिक महत्त्व असते. श्रीवामनराज प्रकाशनाने अशी स्तोत्रे, नित्यपाठ ही पुस्तकेही प्रकाशित केली आहेत.



**प्रा. डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा,
हायवे ठाणे - ४०० ६०१.

●●●

(पान २२ वरून)

**वाढदिवसाचे वाढते प्रस्थ !**

एक गोष्ट मात्र होते की छपाईवाले, खेळणी व डेकोरेटर्स व कॅटरर्स यांना व्यवसाय मिळतो. परंतु तरीही मध्यमवर्गीयांना न पेलणारा असा हा उत्सव आहे असे प्रामाणिकपणे मला वाटते.

राजकीय नेत्यांमध्ये सध्या या उत्सवाची चढाओढ लागलेली दिसते.

कालपरवापर्यंत गल्लीबोळात टपोरीगिरी करत फिरणारा एखादा मुलगा एका रात्रीत साहेब, भाई किंवा दादा बनतो. त्याची चमचेगिरी करणारे टोळके त्या भाईचे मोठमोठ्ठे बॅनर्स किंवा पोस्टर्स लावून शुभेच्छा देण्याचे प्रदर्शन करतात.

सुज्ञ नागरिक हे सर्व पाहून मनामध्ये चरफडतात, निंदा करतात. पण त्यांना काही फरक पडत नाही. मी किती मोठा हे दाखवण्यासाठी त्यांचा आटापिटा चाललेला असतो.

त्यापेक्षा कोणताही गाजावाजा न करता विधायक कार्य करून आपला वाढदिवस साजरा करण्याची सद्बुद्धी ईश्वर त्यांना देवो ही मनापासून सदिच्छा!

**सौ. अंजली विजय पटवर्धन**
पूर्व प्रा. विभाग,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
२५४२६२७०

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

जून महिन्यात शालेय वर्षाची सुरुवात झाली. पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचे गोळ्या देऊन स्वागत करण्यात आले. दि. २७ जून, २००९ रोजी लहान व मोठ्या शिशुची पालकसभा घेण्यात आली.

**आषाढी एकादशी :**

आषाढी एकादशीनिमित्त मोठ्या शिशुतल्या मुलांची दिंडी काढण्यात आली. दिंडीतील बालवारकरी टाळ व पताका घेऊन नाचत नाचत विठुचा गजर करीत होती. वारकऱ्यांची दिंडी पाहण्यासाठी प्रत्यक्षात बेडेकर मंदिरात विठोबा-रखुमाई अवतरले होते. विठोबा-रखमाईची पूजा करून दिंडीला सुरुवात करण्यात आली. सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उत्साहाने दिंडीत सहभागी झाले होते. मा. डॉ. विजय बेडेकर व डॉ. महेश बेडेकर हे सुद्धा दिंडीत सामील होते व त्यांनीही बालवारकऱ्यांचे कौतुक केले.

**गुरुपौर्णिमा :**

प्रत्येक वर्गात एकेक गुरु-शिष्याची जोडी करून गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. गुरुशिष्यांच्या जोडीद्वारे त्या त्या गुरुशिष्यांची गोष्ट सांगून गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगण्यात आले. द्रोणाचार्य-एकलव्य, रमाकांत आचरेकर-सचिन तेंडुलकर, धौम्यऋषी-अरुणी, रामदासस्वामी-शिवाजी महाराज, रामकृष्ण परमहंस-स्वामी विवेकानंद अशा गुरुशिष्यांच्या जोड्या सादर करण्यात आल्या.

**दिपपूजा :**

वर्गात निरनिराळे दिवे मांडून त्यांची पूजा करण्यात आली. प्रत्येक दिव्याचे नाव सांगून त्यांची ओळख करून देण्यात आली व दिव्यांची माहिती सांगण्यात आली.



**गुरु शिष्याची जोडी**

**नागपंचमी :**

नागपंचमीला मातीचे वारूळ करून नागोबाची पूजा करून पुरुणाचा नैवेद्य दाखविण्यात आला. मुलांना नागोबाची माहिती व गाणी सांगण्यात आली. झिम्मा, फुगडी हे खेळ खेळण्यात आले.

कला चिल्ड्रन ॲकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला व हस्तकला स्पर्धेत तिसऱ्या वर्षी देखील बालगौरव पुरस्कार पूर्व प्राथमिक विभागातील कु. प्रथमेश मारूती शेळके ह्या विद्यार्थ्यास मिळाला. तसेच ॲक्टीव स्कूल ॲवार्ड शाळेला व ॲक्टीव प्रिन्सिपल ॲवार्ड शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांना मिळाले.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

◈ २००९-२०१० या शालेय वर्षाचा शुभारंभ १५ जून २००९ रोजी इयत्ता १ली च्या विद्यार्थ्यांचे गोळ्या वाटून स्वागत करून झाला. तसेच सर्व शिक्षण मोहिमे अंतर्गत शासनातर्फे इयत्ता १ली ते ४थी च्या सर्व मुला-मुलींना शालेय पाठ्यपुस्तकाचे मोफत वाटप संस्थेचे कार्याध्यक्ष मा. डॉ. विजय बेडेकर व पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. विदुला वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

◈ दिनांक २७ जून २००९ रोजी इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गाची पालक शिक्षक सभा घेण्यात आली. पालकसभेत वर्षभरातील अभ्यासक्रम व परीक्षांचे नियोजन पालकांना सांगण्यात आले. तसेच सदर सभेत पालक-शिक्षक संघ व माता पालक संघाची स्थापना करण्यात आली.

◈ शुक्रवार दिनांक ३ जुलै २००९ रोजी आषाढी एकादशीनिमित्त इयत्ता १ली ते ४ थी च्या विद्यार्थी वारकऱ्यांची विद्या प्रसारक मंडळाच्या प्रांगणात दिंडी काढण्यात आली. दिंडी मध्ये सर्व शिक्षक पालक सहभागी झाले होते व विद्यार्थी वर्ग रामदास, तुकोबा, ज्ञानदेव, मुक्ताई व वारकरी पोशाखात विठ्ठल नामात रंगून गेला होता. सर्व शाळेचे वातावरण विठुमय झाले होते.

◈ मंगळवार दिनांक ७ जुलै २००९ रोजी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. इयत्ता १ ली, २ री च्या विद्यार्थ्यांसाठी माजी मुख्याध्यापिका सौ. सुलभा दांडेकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. तर इयत्ता ३री, ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी सौ. जोगळेकर यांना आमंत्रित केले होते. दोन्ही पाहुण्यांनी गुरुपौर्णिमेची विद्यार्थ्यांना उत्तम माहिती सांगितली व मार्गदर्शन केले.

◈ मंगळवार दिनांक २१ जुलै २००९ रोजी आषाढ अमावस्या या दिवशी दीप पूजन करण्यात आले. दीप पूजेसाठी पुरातन कालातील सर्व दिवे लावून विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले व त्या दिवसाचे महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले. दिवा हा प्रसन्नतेचा, प्रकाशाचा व चांगल्या आरोग्याचा द्योतक आहे हे पटवून दिले.

◈ सन २००८ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल ९७.२२% इतका लागला. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे - कु. ऋजुता नयन काबाडी ३०० पैकी २८८ गुण मिळवून जिल्ह्यात चौथी आली. कु. रोशनी संजय दिघे ३०० पैकी २७० गुण मिळवून जिल्ह्यात नवव्या क्रमांकावर आली. तर चि. करण प्रवीण निपुर्ते ३०० पैकी २६६ गुण मिळाले. तो जिल्ह्यात अठराव्या क्रमांकावर आला. सदर परीक्षेस सौ. ललिता फिरके, सौ. रश्मी धर्माधिकारी, सौ. गीताली अंबिके या शिक्षिकांनी मार्गदर्शन केले. वरील सर्व उपक्रमांना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले होते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा, प्राथमिक विभाग

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल :**

◈ फेब्रुवारी २००९ मध्ये आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ९६% लागला.

खालील पाच विद्यार्थ्यांना शहरी विभागात शिष्यवृत्ती मिळाली.

| | | |
|---|---|---|
| १. कुमारी रणदिवे रित्तीका निलेश | - | ७ वी |
| २. कुमार बोडस श्रीहरी आनंद | - | १० वा |
| ३. कुमार शिंदे सोहम संदीप | - | १२ वा |
| ४. कुमारी पिसाट शिवानी रवींद्र | - | १३ वी |
| ५. कुमार साठे ओमकार धनंजय | - | १५ वा |

◈ 'इंडियन इन्टिटिट्यूट फॉर स्टडीज इन मॅथ्स' तर्फे




**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा निकाल २००८-२००९ विद्यार्थी - शिक्षक**
**शिक्षक - सौ. फिरके, मध्यभागी मुख्याध्यापिका सौ. भंडारे, सौ. अंबिके, सौ. धर्माधिकारी**
**विद्यार्थी - रोशनी दिघे, ऋजुता काबाडी, करण निपुर्ते**

घेण्यात आलेल्या 'मॅथ्स टॅलेन्ट सर्च' परिक्षेत इयत्ता ३ री तील मिहीर मोहन देसाई हा राष्ट्रीय स्तरावर ३५ व्या क्रमांकावर उत्तीर्ण झाला.

◈ रोटरी क्लब तर्फे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये इयत्ता ४ थी तील राहुल ढवळे हा विजयी झाला.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा, माध्यमिक विभाग

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकाल - एप्रिल २००९ :**

वाडिया कॉलेज पुणे आयोजित महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत कु. वृषाली प्रसादे हिने राज्यात १४ वा क्रमांक पटकावला.

**विज्ञान प्रतिष्ठान परीक्षा - २००९ :**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी : १००%

| ५ वी | ६ वी | ७ वी | ९ वी | एकूण |
|---|---|---|---|---|
| ११ | ०३ | ०२ | ०३ | १९ |

यादीत क्रमांक आणि रोख पारितोषिक मिळालेले विद्यार्थी-

| | | | |
|---|---|---|---|
| इ. ५ वी - | प्रणिल जोशी | - | १९ वा क्रमांक |
| | चैतन्य केळकर | - | १९ वा क्रमांक |
| | प्रथमेश माने | - | ६४ वा क्रमांक |
| | मयुरेश नवरे | - | ६४ वा क्रमांक |
| | मितेश सरोदे | - | ६४ वा क्रमांक |
| इ. ६ वी - | सन्मय आघारकर | - | १८ वा क्रमांक |
| इ. ७ वी - | नेहा पुसाळकर | - | १० वा क्रमांक |
| | अनघा करमरकर | - | ३३ वा क्रमांक |

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २००८-०९ चा निकाल :**

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी.

१) प्राची जैस्वाल - प्रथम क्रमांक
२) मृण्मयी जोगळेकर - द्वितीय क्रमांक
३) रिया दाते
४) मिहीर कुलकर्णी
५) प्रियज नाबर
६) शारंग भिडे
७) हर्षाली भोसले
८) हर्षदा कुलकर्णी
९) मधुरा गोडबोले
१०) मैत्री सत्रा
११) पुष्कर ओक

**वर्ष २००९-२०१० मधील व्याख्याते :**

१) २९ जून ०९ - इ. ८ वी साठी श्री. यदुराज खडपेकर द्वारा सर्पांविषयी माहिती देणारे व्याख्यान.

२) ३ जुलै ०९ - IITS चे प्रोफेसर श्री. मल्हार कुलकर्णी यांचे पाणिनी सूत्रांसंबंधात मार्गदर्शन, इ. ५ वी साठी

३) विद्यमान १० वीच्या विद्यार्थ्यांनी SSC बोर्डात तिसरी आलेली तेजल प्रधान, शाळेत दुसरी आलेली अमला भागवत ९१% गुण मिळवून हिंदी विषयात प्रथम आलेला ओंकार राडये यांची मुलाखत घेतली.

४) ४ जुलै' ०९ - श्रीमती पाटणकर आणि त्यांचे सहकारी यांनी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना आनंदवन प्रकल्पाची माहिती दिली.

५) १८ जुलै' ०९ - परीक्षा २००८ मधे महाराष्ट्रात प्रथम आणि संपूर्ण भारतातून २९ वा क्रमांक पटकणाऱ्या अनिकेत मांडवगणे यांची इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनी मुलाखत घेतली आणि त्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**चीन मधे झालेल्या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनाचा निकालः**

चीन येथे झालेल्या २४ व्या 'China Adolescent Science & Technology Innovation Contest' मधे भाग घेण्यासाठी आमचे दोन विद्यार्थी कु. कौस्तुभ चिपळूणकर आणि कु. अमित पाटणकर चीन येथे गेले. तिथे त्यांनी आमचा "Wastage control in School Premises" (शाळा परिसरातील टाकाऊ वस्तूंचे नियंत्रण) हा प्रकल्प सादर केला आणि विशेष गुणवत्ता पुरस्कार प्राप्त केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरवले जाण्याचे आमच्या शाळेचे हे सलग तिसरे वर्ष आहे.

## जोशी-बेडेकर कला-वाणिज्य महाविद्यालय

दि. ०८-०६-०९ ते १०-०७-०९ या कालावधीत जोशी-बेडेकर महाविद्यालयात संपन्न झालेले कार्यक्रम

◈ दि. २०-०६-०९ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना' गटातर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. एकंदर ३३ जणांनी रक्तदान केले.

◈ दि. २३-०६-०९ रोजी 'संस्कृत संवर्धिनी' मण्डळातर्फे 'महाकवी कालिदास दिनाचे' आयोजन करण्यात आले. रामनारायण रूईया महाविद्यालयाच्या संस्कृतविभागप्रमुख डॉ. मञ्जूषा गोखले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. महाकवी कालिदासाच्या सप्त कलाकृती आणि वाङ्मयशैली या विषयावर अत्यंत रसाळपणे त्यांनी व्याख्यान दिले.

◈ दि. २८-०६-०९ ते ०३-०७-०९ या कालावधीत 'राष्ट्रीय सेवा योजना' गटातर्फे पोलिओ निर्मूलन मोहिम-अंतर्गत ठाणे - स्टेशन परिसरात कार्य करण्यासाठी १० विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून सहभाग घेतला.

◈ दि. ३०-०६-०९ रोजी तत्त्वज्ञान विभाग व संशोधन केंद्रातर्फे डॉ. भेलके यांनी "Concept of Mind and Consciousness in Indian Philosophy' या विषयावर व्याख्यान दिले. जानेवारी २०१० मध्ये संपन्न होणाऱ्या 'Mind, Brain and Consciousness' या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्राची पूर्वपीठिका म्हणून ज्या व्याख्यानमालिका आयोजित करण्यात आल्या, त्यापैकी डॉ. भेलके यांचे प्रथम व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बकुल जोशी यांनी भूषविले. या प्रसंगी चर्चासत्राचे सह-अर्थसहाय्यक डॉ. अजय सिंह यांनी विशेष उपस्थिती होती.

◈ दि. ०२-०७-०९ रोजी माहिती-तंत्रज्ञान विभागातर्फे 'Ciber Attack - Credit card and ATM card Fraud and web Haking' या विषयावर प्रा. विनोद वझे व प्रा. राशी गुप्ता यांचे व्याख्यान झाले.

◈ दि. ०६-०७-०९ रोजी 'बजेट २००९' या विषयावर थेट प्रक्षेपणासह चर्चा थोरले बाजीराव सभागृहात झाली. डॉ. विजय बेडेकर आणि ठाणेस्थित प्रथित यश 'चार्टर्ड अकाउंटंट' मंडळींचा चर्चेत सहभाग होता.

◈ दि. ०७-०७-०९ रोजी गुरुपौर्णिमेचे निमित्त साधून ॲड माधवी नाईक तसेच श्री. रवींद्र मांजरेकर या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांसह अनेकांची उपस्थिती महाविद्यालयात होती. या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांतर्फे सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. विजय बेडेकर आवर्जून उपस्थित होते.

◈ दि. ०९-०७-०९ रोजी 'व्याससभा' उपक्रमांतर्गत प्रा. डॉ. मुग्धा कुलकर्णी यांनी संस्कृत पाठ प्राध्यापकांना शिकविला. त्यानंतर 'बजेट' या विषयावर प्रा. प्रियंवदा टोकेकर व प्रा. दिगंबर भिडे यांची अभ्यासपूर्ण व्याख्याने झाली.

◈ दि. १०-०७-०९ रोजी मराठी विभागातर्फे 'ग्रंथालयाचा अभ्यासाठी वापर प्रभावीपणे कसा करावा व ग्रंथालय व माहिती-शास्त्र या विषयातील विविध व्यवसाय संधी' या विषयावर ग्रंथपाल नारायण बारसे यांचे व्याख्यान झाले.

**– प्रा. डॉ. मुग्धा कुलकर्णी**

## वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

### राष्ट्रीय विकासात अणुऊर्जेचे योगदान :

भारतीय अणुविज्ञान संस्था आणि विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय विकासात अणुऊर्जेचे योगदान' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र ४ जुलै २००९ रोजी वि.प्र. मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात पार पडले. या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी भाभा अणुऊर्जा संशोधन केद्रांचे वैज्ञानिक आणि इलेक्टॉनिक्स् आणि इस्ट्रमेंटेशन सर्व्हिस विभागाचे प्रमुख श्री. व्हि.के. चढ्ढा, भारतीय अणुविज्ञान संस्थेचे सचिव श्री. आर. के. सिंग, वि.प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, प्राचार्य डी. के. नायक, या राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमंत्रक आणि इलेक्ट्रॉनिक्स् विभाग प्रमुख प्रा. कीर्ती आगाशे आणि ISTE विभाग सचिव प्रा. गीता इंगवले उपस्थित होत्या.

अणुऊर्जेच्या मुलभूत तंत्रज्ञानाची ओळख, त्याचे व्यावहारिक उपयोग आणि या तंत्रज्ञानाची आवड विद्यार्थी दशेतच निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम ठाण्यात करण्यासाठी आम्ही प्रयत्न केले आणि त्याला भाभा अणुसंशोधन केंद्राच्या भारतातील शास्त्रज्ञांनी आवडीने सहकार्य दिले असे या राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमंत्रक प्रा. कीर्ती आगाशे यांनी सांगितले.


या चर्चासत्रात अणुऊर्जा महामंडळाचे अतिरिक्त मुख्य अभियंता बी. व्ही. एस. शेखर यांनी भारताच्या तीन स्तरीय अणुऊर्जा प्रकल्पाची तर कल्पकम येथील शास्त्रज्ञ श्री. मुरूगन यांनी समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्याचे पाणी बनविण्याच्या प्रकल्पाची माहिती दिली. पहिल्या सत्राच्या अखेरीस बोर्ड ऑफ रेडिएशन अँड आयसोटोप टेक्नॉलीजीचे वरिष्ठ सरव्यवस्थापक एम. शिवप्रसाद यांनी रेडिओ आयसोटोपचे वैज्ञकिय तंत्रज्ञान, शेती, हिऱ्यांचे रंग बदलविणे, पॉलिमरची निर्मिती, संरक्षण खात्यातील उपयोग अशी उपयुक्त माहिती देऊन विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

द्वितीय सत्रात वैज्ञानिक अधिकारी मनोज श्रीवास्तव यांनी शेती उद्योगात उत्पादन वाढीसाठी, कीड रोखण्यासाठी, टिश्यु कल्चर, भाजीपाला निर्जंतुक करण्यासाठी अणुऊर्जेचा कसा वापर होतो याची माहिती दिली.

अणुऊर्जेचा नव्याने विकसित होणाऱ्या मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रातील सिटी स्कॅन, पेट, टोमोग्राफी, अल्ट्रासोनी, एम. आर. आय. अशा तंत्रज्ञानातील उपयोगाची माहिती रेडिएशन सेंटरचे वैज्ञानिक नबाब सिंग आणि कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे उपप्राचार्य डॉ. अजय देशमुख यांनी देऊन विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या ISTE विभागाचे कामकाज या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुरू झाले.

**प्रा. कीर्ती आगाशे**
मोबा. : ९७६६६२८५१५




**व्यासपीठावर डावीकडून (बसलेले) इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख प्रा. कीर्ती आगाशे, वि.प्र.मंडळाचे श्री. व्ही. के. चढ्ढा, वि.प्र. मंडळ कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, भारतीय अणुविज्ञान संस्था सचिव श्री. आर. के. सिंग, वरिष्ठ सरव्यवस्थापक बी. आर. आय. टी.आी. एम्. शिवप्रसाद.**
**डावीकडून (उभे) - बी. ए. आर. सी. कल्पकम, वैज्ञानिक श्री. मुरूगन, अणुउर्जा महामंडळ अतिरिक्त मुख्य अभियंता श्री. बी. व्ही. एस. शेखर, बी. ए. आर. सी. वैज्ञानिक अधिकारी श्री. मनोज श्रीवास्तव**

**व्ही.पी.एम. च्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्याची सुवर्ण संधी :**

विद्या प्रसारक मंडळ ही ठाण्यातील शिक्षण देणारी अग्रगण्य संस्था आहे. या संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. जगात शैक्षणिक क्षेत्रामध्ये बरेच बदल होत असतात. संस्था नेहमीच नव्या बदलांना सामोरी जात असते. त्याची जाणीव ठेऊन आपल्या विद्यार्थ्यांना त्या पद्धतीची शिक्षण पद्धती राबवायला हवी व नवीन नवीन कोर्सेस परदेशात सुरू करून किंवा परदेशातील कोर्सेस आपल्या संस्थेत सुरू करून शैक्षणिक आदान प्रदान करणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून विद्या प्रसारक मंडळाने अमेरिकेतल्या कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने मास्टर्स ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि डॉक्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनचे कोर्सेस सुरू केले आहेत. तसेच स्वीडनच्या स्कोडे युनिव्हर्सिटीचे कोर्सेसही सुरू झाले आहेत.


तसेच नॉदर्न कॉलेज ऑफ ऑलाइड आर्टस् ॲण्ड टेक्नालॉजी ऑफ कॅनडा येथे भारतीय विद्यार्थ्यांसाठी प्रवेश घेता येणार आहे. अशा पद्धतीचा करार नुकताच विद्या प्रसारक मंडळाने केला आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कॅनडामध्ये शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. अशा पद्धतीचा करार विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनने नॉदर्न कॉलेज ऑफ ऑलाइड आर्टस् ॲण्ड टेक्नालॉजी ऑफ कॅनडा या कॉलेजबरोबर दि. १५ जून २००९ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात करण्यात आला. कॅनडाच्या कॉलेजचे उपाध्यक्ष फ्रेड गिबन्स, विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य डी. के. नायक व डॉ. पी. एम. केळकर यांच्या उपस्थितीत सोमवारी या करारावर सह्या झाल्या.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या निर्णयामुळे परदेशी शिकणाऱ्या अभ्यासक्रमाची दालन भारतीय विद्यार्थ्यांसाठी खुली होत आहेत.

या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना SBI व कॅनरा बँकेकडून शैक्षणिक कर्जाची सोय केली जाणार आहे.

**संकलित**

●●●



# स्वप्न साकारत आहे...

*(१ ऑगस्ट हा आमच्या विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन. त्या निमित्ताने)*

*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*
*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

*- डॉ. वा. ना. बेडेकर*

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

## विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)
२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)
३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)
४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)
५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय
६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
७) वि. प्र. मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय
८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था
९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान केंद्र
११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

- भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला
- डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान
- नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन
- दिशा व्यासपीठ
- विद्या प्रसारक मंडळ - वर्धापनदिन
- ५ सप्टेंबर - दीक्षान्त समारंभ

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.